# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## वाङ्मय मंडळ २०२३-२४

५ सप्टेंबर २०२३

# गुरुवंदना

# आदर्श शिक्षक विशेषांक



Principal
Government College of Education (C.T.E.)
Panvel, Dist. Raigad - 410 206

## प्रेरणा

प्राचार्य

डॉ.रमा भोसले

## संपादक मंडळ

### संपादक

प्रा.डॉ.बी.जी.खाडे

### सहसंपादक

श्री.मीनाक्षी चव्हाण

श्री.मनीषा पोतेकर

श्री.भावना भगत

श्री.प्रतिक पवार

टीप: या अंकात व्यक्त झालेली मते निबंध लिहिणाऱ्या शिक्षक प्रशिक्षणार्थी यांची वैयक्तिक आहेत.संपादक मंडळ त्याच्याशी सहमत असेलच असे नाही.



ज्ञानाच्या अथांग महासागरात राजहंस घडविणाऱ्या

प्रत्येक गुरुच्या चरणी विनम्रतापूर्वक अर्पण...



## प्रस्तावना

**ज्ञानाचा प्रकाश देण्या दिव्या सम जळतो,**

**जीवनाचा खरा मार्ग गुरुमुळेच कळतो...**

ज्ञान देणे आणि ज्ञान घेणे हा जगातील सर्वोत्तम संस्कार आहे असं म्हटलं जातं. आणि हा संस्कार आजन्म रुजवत शतकानू शतके ज्यांनी सुजाण नागरिक सुजाण विद्यार्थी घडविण्याचे काम केलं ते म्हणजेच तुम्हा आम्हा सर्वांचे गुरु अर्थातच शिक्षक.भारतीय संस्कृतीत तर गुरु शिष्य परंपरेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आणि तितकाच जाज्वल्य इतिहास सुद्धा आहे. अज्ञानाच्या अंधाकारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जात प्रगतीची वाट सोपी करणारा वाटसरू म्हणजे आपल्या आयुष्यातील गुरु होय. आणि या गुरूप्रति कृतज्ञ राहणे हे प्रत्येक शिष्याचे परमकर्तव्य आहे.

"अविद्येनेच माणसाचे दारिद्र्यपण फोफावते" असे म्हणत शिक्षणाची बीजे जनसामान्यांच्या घरात रुजविणारे महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीआई फुले तसेच " शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो प्रश्न करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही" असे म्हणणारे जगातील सर्वश्रेष्ठ विद्यार्थी डॉ.बाबासाहेब आंबेडकर,कर्मवीर भाऊराव पाटील यांसारखी असंख्य माणसं ही शिक्षण क्रांतीचे जनकच आहेत. आणि शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक शिष्यासाठी आदर्श गुरु आहेत. आणि हीच शिक्षणाची बीजे रुजविणाऱ्या प्रत्येकास अभिवादन करीत आपल्या आयुष्यातील गुरुप्रती असलेली भावना शब्दातून व्यक्त करण्याचा प्रयत्न आम्ही या विशेषांकातून करीत आहोत.

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल वाङ्मय मंडळाच्या बी.एड प्रथम वर्षातील शिक्षक प्रशिक्षणार्थींनी आपल्याला शालेय किंवा महाविद्यालयीन स्तरावर लाभलेल्या आणि भावी आयुष्यात संस्कारांची शिदोरी ठरलेल्या आपल्या आदर्श शिक्षका विषयी आपल्या भावना,आदर आणि कृतज्ञता निबंधातून व्यक्त केल्या आहेत. महाविद्यालयीन स्तरावर " माझे आदर्श शिक्षक " या विषयावरती निबंध स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला. तदनंतर या स्पर्धेतील निबंधांचे वाङ्मय मंडळ प्रतिनिधींद्वारे परीक्षण करून त्यातील काही निवडक निबंधांचा समावेश ' गुरुवंदना ' या विशेषांकात करीत आहोत. छात्राध्यापकांनी त्यांच्या आयुष्यात त्यांच्या आदर्श शिक्षकाचे स्थान, त्यांचा शैक्षणिक प्रवास,आणि त्या शिक्षकांच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष संस्कारातून आपल्या आयुष्याला मिळालेले एक चांगले आणि वेगळे वळण याचा परामर्श अगदी समर्पकरित्या यथार्थ शब्दात केला आहे.

छात्राध्यापकांमधील लेखन कौशल्य, सृजनशीलता, आणि त्यांच्या गुरूंचे वेगळेपण यांचा अविष्कार या विशेषांकाद्वारे करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. भविष्यात शिक्षक होत असताना आपल्या डोळ्यांसमोर असलेली आदर्श शिक्षकाची प्रतिमा आणि त्यातून स्वतःच्या माध्यमातून घडणारे आदर्श शिक्षक या साऱ्यांचा आशावाद म्हणजे हा विशेषांक आहे. आणि हाच आशावाद आपणा सर्व वाचकांसमोर ' गुरुवंदना ' या विशेषांकाच्या माध्यमातून सादर करताना आम्हाला अत्यानंद होत आहे..

**प्रा.डॉ. बी.जी.खाडे**

**संपादक**

# अंतरंग

| प्रस्तावना |
|---|


| अनु.क्र. | छात्र अध्यापकांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रतिक स्मिता उत्तम पवार | १ |
| २. | सुमन कन्हैय्या शर्मा | ४ |
| ३. | निलेश दत्तात्रेय धापटे | ७ |
| ४. | जयश्री संतोष जाधव | ९ |
| ५. | मनीषा शंकर पोतेकर | ११ |
| ६. | शितल विजय इंगोले | १३ |
| ७. | कोमल केशव तिवरेकर | १६ |
| ८. | अर्चना भास्कर झावरे | १८ |
| ९. | प्रतिज्ञा मोहन कोडग | २० |
| १०. | भावना शिवराम भगत | २२ |
| १२. | मीनाक्षी मनोज चव्हाण | २४ |
| १३. | प्रियंका जानू भोये | २६ |
| १४. | करण लिंबराज गरड | २८ |
| १५. | सायली दिपक म्हात्रे | ३० |

माझे आदर्श शिक्षक

**माझ्या गाण्याचा पहिला ' सा '**

श्रीमती. तनुजा श्रीकांत पाटणकर

(संगीत शिक्षिका- वि.खं.विद्यालय पनवेल)



वसा,वारसा,संस्कार,आणि शिकवण प्रत्येकाला वेगवेगळ्या माध्यमातून मिळत असते. पण हे सगळे गुण ज्यांच्याकडून मिळतात ते आपले आदर्श मग आईवडील असो, शिक्षक असो वा अन्य कोणी महान व्यक्ती. या सगळ्या गुणांची जपणूक करणारा माणूसच आदर्श माणसाचं खरं उदाहरण बनतो. माझ्या बाबतचा माझा प्रवास जेव्हा मी डोळ्यांसमोर आणतो त्यावेळेस या सगळ्या गुणांचे अंतर्भाव माझ्यात माझ्या आई-वडिलांनंतर जर कोणी केले असतील तर ते व्यक्तिमत्व म्हणजे माझ्या माध्यमिक शाळेतील अर्थात व्ही. के. हायस्कूल पनवेल या शाळेतील संगीत शिक्षिका आणि माझ्या आदर्श शिक्षिका आदरणीय तनुजा पाटणकर मॅडम.

इयत्ता सहावीत होतो तेव्हा व्हि.के. गीतमंचात प्रवेश मिळावा म्हणून धडपड करणारा मी.गाणं - संगीत या सर्वांबाबत प्रचंड आवड होती आणि आहे. त्यावेळेस शाळेच्या संगीत शिक्षिका आणि माझ्या गाण्याचा पहिला ' सा ' अर्थात गुरुवर्य पाटणकर मॅडम यांना मोठ्या हिम्मतीने जाऊन भेटलो. हसरा चेहरा आणि गळ्यातला सूर जितका गोड आहे तितकाच गोड स्वभाव अशा आमच्या मॅडम. एके दिवशी असाच अचानक संगीताच्या तासाला मला सर्वांसमोर बोलून हार्मोनिअमवर राष्ट्रगीत गायला लावले. हार्मोनिअम हा प्रकारच पहिल्यांदा समोर आल्याने पुरता घाबरून गेलेला मी, माझीही स्थिती मात्र मॅडमने अचूक हेरली. आणि " तू बिनधास्त गा जिथे चुकेल तिथे चूक सुधारायला मी आहे."असं म्हणून मला आत्मविश्वास दिला आणि हार्मोनिअम वर पहिल्यांदाच गाताना यशस्वी ठरलो. सुर,ताल, लय,अगदी अचूक.

**प्रयत्नांची मुळे कडू असली तरी त्याची फळे मधुर असतात....**

मॅडमनी माझ्याकडे पाहून स्मितहास्य दिलं आणि "उद्यापासून प्रार्थनेला ये!" असं म्हणून माझं गीत मंचात स्वागतच केलं.

आणि याच दिवसापासून आमचा एक वेगळं नातं जडलं. शाळेत असताना बराचसा वेळ माझा संगीत कक्षातच जायचा. मॅडम किती वाजता कोणत्या वर्गावर असतात , इथपासून त्यांचं वेळापत्रक मला अगदी तोंडपाठ असायचं.. इतकच नव्हे तर प्रतीकला शोधायचं असेल तर पाटणकर मॅडम यांना भेटायचं आणि पाटणकर मॅडमना शोधायचं असेल तर प्रतीकला भेटायचं.हे एक समीकरणच शाळेत झालेलं होतं. जे सगळ्यांसाठी अगदी वेगळं बनलं होतं.आणि आजही ते तसंच आहे.

पाचवी ते बारावी या माझ्या सात वर्षाच्या अभूतपूर्व प्रवासात माझ्या संगीतरुपी आयुष्याचा प्रवास मी केवळ मॅडममुळे करू शकलो. माझ्या प्रत्येक यशात मॅडमचा सिंहाचा वाटा आहे. आज प्रतीक जर अनेक ठिकाणी छोटे-मोठे कार्यक्रम करत असेल, गायक म्हणून किंवा निवेदक म्हणून आज प्रतिकला जर ओळख मिळाली असेल,तर त्याचे संपूर्ण श्रेय पाटणकर मॅडम यांचेच आहे. प्रतीक पवार ते शाहीर प्रतीक पवार ही ओळख सुद्धा मी मॅडमच्याच बळावरती प्राप्त केली.

१) माझं हार्मोनिअमवरचं पहिलं गीत.

२)शाळेच्या ध्वजारोहण समारंभातील माझं पहिलं गीत.

३)शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रम अर्थात गॅदरिंग मधील माझं पहिले गीत.

४)गाण्याच्या स्पर्धेची पहिली ऑडिशन आणि पहिली स्पर्धा.

५)गाण्याच्या पहिल्याच स्पर्धेत अंतिम फेरीत निवड.

६)पहिला पोवाडा गायन आणि लेखन.

७)पोवाडा गायन स्पर्धेचे पहिले बक्षीस.

८) पोवाड्याचा पहिला कार्यक्रम.

९)निवेदक म्हणून पहिली संधी, पहिला रंगमंच.

१०)पहिले गीत लेखन.

११)गाण्याचे पहिले बक्षीस.

१२)वक्तृत्वातील सर्वात मोठे आणि महत्त्वाचे बक्षीस.

१३)माझ्या घरात रियाजाकरता आलेली हार्मोनियम.

या आणि अशा कितीतरी गोष्टी फक्त तुमच्यामुळेच माझ्या आयुष्यात आल्या आहेत. ज्याची यादी पूर्ण होऊच शकत नाही. आयुष्यातील माझ्या यशाच्या प्रत्येक टप्प्यात तुमचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. आई वडील आणि त्यानंतर किंवा त्यांच्याबरोबर निःशंकपणे माझ्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाची व्यक्ती तुम्ही आहात. माझ्या यशात पाठीवर शाबासकीची थाप आणि चुकीच्या वेळेस हक्काने कान पकडणे या सर्वांमुळेच आज मी मार्गक्रमण करीत आहे.

आज मी गातो, पण शास्त्रशुद्ध गाणं शिकू शकलो नाही. पण आज जेव्हा माझ्या गाण्याबद्दल आपुलकीने कोणी विचारत की तू शिकलास का? कोणाकडे गाणे शिकलास? तर क्षणाचाही विलंब न लावता हात कानाजवळ जातो आणि हो! पाटणकर मॅडम यांच्याकडे मी गाणं शिकलो किंवा गाण्याचा पहिला 'सा' मला पाटणकर मॅडमनी शिकवला असं मी हक्काने

**मनस्वी कार्यार्थी व्यक्तीने कार्य करीत असताना सुख दुःखाची पर्वा करू नये...**

म्हणतो. गाण्याची आवड असलेल्या पण परिस्थिती अभावी किंवा इतर काही गोष्टींमुळे गाणं शिकू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गळ्यात सुरू ओतत कित्येकांच्या आयुष्याची सरगम तुम्हीच छेडली आहे. एक आदर्श शिक्षक होण्यासाठी कोणते गुण असावेत? किंवा एका आदर्श शिक्षकाचे व्यक्तिमत्व कसे असावे? असा मला जर कोणी प्रश्न विचारला तर मी थेट तुमचं नाव घेईन. कारण दातृत्व,कर्तुत्व आणि मातृत्व हे सारे गुण तुम्ही तुमच्या उभ्या आयुष्यात जपत आलात. आणि तुमच्या याच गुणातून आमच्या वरती संस्कार घडत गेले याचा मनोमन सार्थ अभिमान आहे. शिक्षक म्हटलं की दोन प्रतिमा डोळ्यासमोर येतात एक म्हणजे विद्यार्थ्यांवरती मालकी हक्क गाजवत मालकत्व लादणारी. आणि दुसरी म्हणजे विद्यार्थ्यांच्या पालकाची भूमिका घेत पालकत्व स्वीकारणारी. मालकत्व आणि पालकत्व यातील फरक शिक्षकांना कळू लागला की शिक्षक हे आपोआपच विद्यार्थीप्रिय आणि आदर्श होऊ लागतात. तुमच्या उभ्या आयुष्यात तुम्ही तुम्हाला लाभलेल्या कित्येक विद्यार्थ्यांच्या पालकत्वाची जबाबदारी घेत त्यांना मायेची उब दिलीत. आणि म्हणूनच शाळेचा प्रवास संपल्यावर इतक्या वर्षानंतरही तुम्हाला आई म्हणूनच हाक मारावीशी वाटते. कारण आईच्या प्रेमाला कोणतीच बंधने आड येत नाहीत. आणि म्हणूनच मी माझ्या एका चारोळीत तुमच्याबद्दल असं लिहिलं होतं की,

**वात्सल्याची मूर्ती**

**करण्याची गाय पाहिली ,**

**रूपात शिक्षिकेच्या**

**मी माझी माय पाहिली**

तुमच्या शिकवणीत घडलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे 'मेरुपरी गुण पर्वतासमान भासती' असं म्हणत प्रत्येकाच्या कलागुणांना एक वेगळा आयाम दिलात. असा आयाम की ज्यात श्रेष्ठ - कनिष्ठ असा भेद नव्हता. असा आयाम जो कायम सर्वांना समान न्याय-समान संधी या तत्त्वावर चालणारा होता. असा आयाम जो विद्यार्थ्यांना स्वतःच काहीतरी नवीन,काहीतरी वेगळं करावं अशी ऊर्जा देणारा होता. आणि म्हणूनच माझ्या आदर्श शिक्षकांच्या संकल्पनेत कायमच तुम्ही अग्रस्थानी आहात. इयत्ता पाचवी ते बारावी हा सात वर्षाचा शाळेत असतानाचा प्रवास आणि त्यानंतर आजवर झालेल्या आपला माय लेकाचा अतूट प्रवास निव्वळ अवर्णनीय आहे. हा प्रवास जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर बहरत राहो, घडत राहो आणि वाढत राहो इतकेच आशा...

---



लेखन : प्रतिक स्मिता उत्तम पवार

बी.एड.प्रथम वर्ष

हजेरी क्रमांक ३१

**वीरांनी नेहमी विजयाच्या धुंदीत जगावं**

# माझ्या आदर्श शिक्षका



**शिक्षकाचे नाव -: डॉ. गीतिका चव्हाण तंबर M.A., M.Phil, ph.d.**

**पत्ता -: नेरूळ, नेव्ही कॉलोनी, नवी मुंबई**

" माझ्या जीवनाची प्रेरणा आहे. तुम्हीच माझे मागदर्शक आहात तुम्हीच माझ्या जीवनाचा 'प्रकाशस्तंभ आहात." ज्ञानाची गोष्ट असो, चांगलामाणूस, बनण्याची गोष्ट असो किंवा मग चांगल्या संस्काराची गोष्ट असो आपल्या या गोष्टी आपल्या आयुष्यात आई वडिलांच्या शिकवणानंतर आयुष्यात दुसरी शिकवण आणि संस्कार हे आपले शिक्षक देत असतात. "चांगु काना ठाकुर महाविद्यालय खांदाकॉलोनी, या महाविदयालयातील माझ्या आदर्श शिक्षिका डॉ. गीतिका तंबर मॅडम या आहेत. "अगदी लहानपणापासुनचा जो शिक्षण क्षेत्रातील माझा जो प्रवास आहे त्यात मी अनेक असे शिक्षक अनुभवले आहेत त्यांचे मार्गदर्शन ही मला भेटलेत आणि त्यामुळे मी पुढची वाटचाल सुद्धा केली आहे. शिक्षणक्षेत्रातील शिक्षकांचे जे काही अनुभव चांगले वाईट आहेत ते मी केले आहेत. पण आजपर्यंतचा प्रवास समजुन होणाऱ्या, मला योग्य ती दिशा दाखवुण माझ्या आदर्श शिक्षिका म्हणजे" डॉ.गीतिका मॅडम प्रत्येक वाटचालीला कसं पूढे जायचं आहे त्यात कोणत्या प्रकारे योग्य गोष्टी त्या मला सांगत आणि मदत ही करत

जगात सर्व प्रथम आदर्श शिक्षिका किंवा गुरु हे आपण आपल्या आई-वडीलांना मानतो किंवा त्यांना केलेले आपल्यावर जे संस्कार असत त्यांनी दिलेली जी शिकवणं असतात त्यांनी दिलेली जी शिकवण असते म्हणून खऱ्या अर्थाने, आपल्या आयुष्यातले आदर्श म्हणून आपले आईवडीलचं असतात, पण माझ्या आयुष्यात जी आईची कमतरता असायची, ती मला सारखी त्रास ठरायची, शिक्षणातील प्रवास करताना कोणताही शिक्षक मला भेटला नव्हता, की जी माझी मानसिक स्थिती 'समजून घेणारा, पण गीतिका मॅम एक खरचं माझ्या आयुष्यातल्या आदर्श शिक्षिका आहेत. कारण आईच आपल्या बाळाला काही त्रास होत असला किंवा काय दुःखत असलं तर विचारते, पण गीतिका मॅडम ती माझी जी कमी होती ती त्यांनी आईप्रमाणे वागुन, मला समजून घेणे हे त्यांनी केले. मलात्यांची शिकवण्याची पद्धत अजुनही आवडते.

कोणता मुद्दा समजला नसेल तर परत विचारा मी सांगेन, त्यांची जी गुणवैशिष्ट आहेत ते त्यासर्व गोष्टीची अंबलबजावणी करतात. माझ्या कल्पना आहेत की प्रत्येक शिक्षक हा आपल्या पाठ्यपुस्तका व्यतिरिक्त जी कॉलेजची काम असतात, तेवढ्याचपुरता "विद्यार्थ्यांशी संपर्कात असतात महाविदयालयात गेल्या मी पाच वर्ष यागोष्टी आत्मसात केल्या आहेत. पण गीतिका मॅडम पाठ्यपुस्तकाला अनुसरून त्याबाहेरच्या गोष्टी थोडक्यात स्पर्धा परीक्षेची तैयारी करणे वेगवेगळ्या क्षेत्रात जाऊन त्या गोष्टी शिकणे यांचे देखील मार्गदर्शन करतात.

महाविद्यालयात एखादया विद्यार्थ्याला आर्थिक मदत पाहिजे असेल, तर त्या नेहमीच करतात. एखादा विद्यार्थी आजारी असला तर त्यांच्या पालकांशी संपर्क साधून त्याची विचारपूस करतात.

**शिक्षक म्हणजे : 1. शि - शिलवान**

**2. क्ष - क्षमाशील**

**3. क - कर्तृत्ववान**

ज्या मध्ये सर्व या गुण असतात, तोच खरा आदर्श शिक्षक होय आणि म्हणून या तिन्ही गोष्टींचा समावेश डॉ. गीतिका मॅडम यांच्यात त्या आहेत.

तुमच्यासारख्या शिक्षिका मिळण हे आशिर्वादापेक्षा कमी नाही माझं जगबदलण्यासाठी मी तुमची नेहमी ऋणी रहीन."

डॉ. गीतिका मॅडम या माझ्या आदर्श शिक्षिका का ? तर त्यांनी एका कुंभारप्रमाणे माझ्या

'जीवनाला मजबूती प्रदान केली आहे त्यांनी मला समाजातील चांगल्या वाईट गोष्टीमधील फरक सांगितले आहे आयुष्य कसे जगायचे हे त्यांनी मला सांगितले आयुष्य जगताना ज्या आपल्या सोबत वाईट गोष्टी झाल्याआहेत. त्या वाईट गोष्टीकडे दुर्लक्ष करून चांगल्या गोष्टीचा मनात विचार आणून शिष्टाचार, धैर्य, सहनशीलता इत्यादी गुणांनी जीवन जगायचे हे पटवून दिलं आहे मॅडमांनी दिलेल्या शिस्तीचा, चिकाटीचा, आत्मविश्वासाचा मंत्र मी आजही जपत आहे.

मला आजही आठवत तसा प्रत्येक शिक्षक विद्यार्थ्याला विचारतो, की तु शिकून पुढे काय करणार आहेस? असच मला मॅडमने पण विचारलं होत पण मी त्या असताना तेव्हा मी त्यांच्या प्रश्नाचा उत्तर दिलं की मी ही तुमच्यासारखी शिक्षिका बनणार आहे. तुमचे आदर्श मी माझ्यात आणणार आहे तेव्हा मॅडम यांचा मला प्रतिसाद चांगल्या प्रकारे होता. येणारा आयुष्यात खूप मेहनत करून तू तुझ्या स्वप्नांना पंखदे , तुझे स्वप्न एक दिवशी नक्की पूर्ण होतील. मॅडमांचे एकच म्हण नेहमी "खूप मेहनत कर आणि आयुष्यात पुढे

जा". तू खूप मेहनती आहेस तू करून तर बघ, तुझ्याशी कठीण गोष्ट आहे तर काय झालं ते पूर्ण करशील या आत्मविश्वासाने मला खूप काही गोष्टी मला ज्या होत नव्हत्या, सोप्प्या गोष्टी ही मला कठीण वाटायच्या त्या मी मॅडमच्या नेहमी बोलण्याप्रमाणे मला एक सकारात्मक ऊर्जा मिळायची आणि मॅडम यांच्या आशीर्वादाने ते मी पूर्ण करत गेली आहे.

त्या एक मेहनती शिक्षिका आहेत, त्यांचा विषय हिंदी असल्यामुळे त्यांची बोलण्याची पद्धत ही उत्तम सुस्पष्ट आणि विषयाची चांगली समाज असल्यामुळे त्या आमच्या महाविद्यालयाच्या प्रशंसनीय शिक्षिका आहेत. गितिका मॅडम यांच्यामध्ये मला एक आदर्श शिक्षकांचे नाही तर एक उत्तम तत्वज्ञा, मैत्रीण,आईप्रमाणे जीवलावणारी आणि मार्गदर्शिका देखील मिळाल्या आहेत.

माझ्या आयुष्यात बरेच शिक्षक मला समजावून गेले आणि समजवतात, पण जितका मॅडम या मला समजून घेतात म्हणून त्या माझ्या खरचं आदर्श शिक्षिका याचं स्थान दिलं आहे आणि नेहमी माझ्या आदर्श शिक्षका त्याच राहतील.

"त्यांच्या बद्दल कितीही बोल तरीही कमीच आहे आणि लिहायचं तर खूप आहे मला त्यांच्याबद्दल त्यांचे आदर्श कितीही लिहिलं बोललं तरी देखील ते कमीच आहे दोन शब्द गीतीका मॅमसाठी

**"||अज्ञान तिमिरान्धस्य ज्ञानाज्जन शलकाया||**

**||चक्षुरुन्मीलिंत येन तस्मै श्री गुरुवे नमः||"**

या ओवि प्रमाणे गीतीका मॅडमने माझ्या जीवनातले जे काही अंधार होते ते त्यांनी त्यांच्या आशीर्वादाने, मार्गदर्शनाने दूर केले आहे.

थोडक्यात आदर्श शिक्षकांचे महत्त्व आपल्या ज्ञानाने व्यक्ती, समाज आणि राष्ट्रघडवणारा तो आदर्श शिक्षक असतो. आदर्श शिक्षक विद्यार्थीमध्ये आत्मविश्वास जागवतो, ज्यामुळे आपल्या जीवनात काहीतरी करून दाखवण्याची हिम्मत येते आणि आपले जीवन हे प्रकाशाने भरून जाते.जे आपल्याला अज्ञानाच्या अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जातात. आणि या सर्व गोष्टीचं श्रेय या गीतीका मॅडमने पूर्ण केल्यात आणि त्या आहेत देखील या सर्व गोष्टी त्यांच्यात आहेत.

जसं हिऱ्याला आकर्षण व चोखदार दिसण्यासाठी सोनार लागतो व तो मेहनत घेतो त्याला तो घडवतो त्याचप्रमाणे मला घडवण्यासाठी आणि आत्मविश्वास जागवण्यासाठी गीतिका मॅडमनेही प्रयत्न केले आहेत. मी त्यांची नेहमी ऋणी राहील आणि त्या माझ्या आदर्श शिक्षिका.

"योग्य काय अयोग्य काय हे सांगता तुम्ही,

खोटं काय खरं काय हे समजवता तुम्ही,

जेव्हा काहीच कळत नाही तेव्हा मार्ग दाखवता तुम्ही,

आयुष्यातील प्रत्येक अंधारात प्रकाश दाखवता तुम्ही."

---



छात्रअध्यापिका -: सुमन कन्हैया शर्मा

हजेरी क्रमांक -:४२

# माझे आदर्श शिक्षक



**प्रा.डॉ.प्रविण घोडविंदे.**



निलेश दत्तात्रेय धापटे

(बी.एड )

शिक्षक डोळ्यासमोर येताच काही शिस्तही डोळ्यासमोर येतात. एक आदर्श व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभे राहते. आदर्श व्यक्तिमत्त्व, प्रामाणिकपणा, विवेकिपणा या सर्वांचे एकत्रीकरण म्हणजे शिक्षक होय. अनेक विद्यार्थांना घडविण्याचे काम शिक्षक करत असतो. आणि यशाच्या टोकापर्यंत पोहचवण्यासाठी नेहमी खटपट शिक्षक करत असतात. उद्याचा समाज घडविण्याचे काम कोण करत असेल तर ते शिक्षक.

मलाही माझ्या आयुष्यात असे माझे आदर्श शिक्षक लाभले आहेत. हे मी माझे भाग्य मानतो. मला माझे आदर्श शिक्षक बी.ए. पदवीचे शिक्षण जिवनदिप कॉलेज खर्डी येथे घेत असतांना लाभले आणि मला शिक्षणाची आवड निर्माण झाली. डॉ. प्रविण सर यांच्याबद्दल सांगायचं झालं तर ते इकॉनॉमिक्स या विषयात Ph.D केलेले set परीक्षा पास झालेले एक अनुभवी व तज्ञ शिक्षक आहेत. सध्या ते रायगड येथील एका कॉलेज मध्ये प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. वयाच्या ३० व्या वर्षीच त्यांनी Ph.D केली. सध्या त्यांचे वय ३५ वर्ष आहे. शिक्षकी पेशा असूनही राहणीमान एकदम साधा.

काहीतरी मिळविण्याच्या हेतूने प्रत्येक विद्यार्थी शिक्षण घेत असतो आणि फक्त पुस्तकी ज्ञान घेऊन कॉलेज मधून बाहेर पडत असतो. या पुस्तकी ज्ञानाचा उपयोग जास्त काळ होत नाही. जग हे स्पर्धेचे बनलेले आहे. इथे स्पर्धेत टिकायच असेल तर आत्मविश्वास व मोलाचे मार्गदर्शन मिळणे खूप आवश्यक आहे. हे मोलाचे मार्गदर्शन मला डॉ. प्रविण सर यांच्याकडून मिळाले. विद्यार्थ्याला आपलंसं करून त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून सांगून त्यांना शिक्षणाबद्दल आवड निर्माण करून देणे ही त्यांची खासियत आहे. विद्यार्थी म्हणजे त्यांच्यासाठी एक त्यांचा सैनिक आणि त्या सैनिकाला लढाइस सज्ज करण्याचे काम डॉ. प्रविण सर करतात. विद्यार्थ्याला सरळ यशाची दिशा दाखवणारे शिक्षक हल्ली खूप कमी बघायला मिळतात. सद्यस्थितीत विद्यार्थी उत्साहाने शिकत नसून त्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांचे ही त्यांच्यावर दुर्लक्ष होते.

त्यामळे सध्याची शैक्षणिक परिस्थिती खूप गंभीर झाली आहे. पण एक अस वय असत की ज्या वयात विद्यार्थी हा शिक्षकाच्या हाताखाली जीवन जगत असतो आणि त्याला जर चांगला शिक्षक लाभला तर तो विद्यार्थी आपलं प्रगती करून घेतो. नाहीतर तो चुकीच्या मार्गाने वाटचाल करत असतो. मलाही असच काही मार्गदर्शन मिळालं ते डॉ. प्रविण घोडविंदे सर यांच्याकडून. सर नेहमी मोलाचे मार्गदर्शन करत असत. फक्त शालेय शिक्षण नाही तर आयुष कस जगाव हे मी त्यांच्याकडून शिकलो. विद्यार्थ्यांना समजून घेण्याची जी चांगली वृत्ती आहे ती अप्रतिम आहे. ज्यामुळे सर्व विद्यार्थी त्यांना नेहमी मर्यादा ठेवणारा मित्र समजायचे. कुणाच्या आर्थिक अडचणी असतील त्या ही सर सोडवत असत.

विद्यार्थ्यांकडे बोलत असताना प्रेमळ स्वभाव पण एक मर्यादा मात्र नेहमी असायची. कधीतरी कॉलेजला जाणारा मी पुढे खूप प्रामाणिक पणे काहीतरी साध्य करण्याच्या हेतूने कॉलेज मध्ये जाऊ लागलो. जीवन कस जगायचं हे आपल्याला आई-वडील व शिक्षकच शिकवतात. विद्यार्थ्यांच्या जीवनात येणाऱ्या अडचणी एक शिक्षक आपल्या अभ्यास व अनुभवातून सोडवत असतो. असेच काही अनुभव आम्हाला सर नेहमी सांगायचे. सर नेहमी सांगायचे की मरणे खूप सोपं आहे पण जगणं खूप कठीण आहे. अस जगा की समाजात आपले हितचिंतक असावे. कोणत्याही परिस्थतीमध्ये खंबीरपणे उभे राहण्यासाठी शिक्षण हे साधन आहे ही भावना निर्माण करत. मला शिक्षणाबद्दल एक आपुलकी ची भावना व शिक्षणावर प्रेम करायला शिकवलं ज्यामुळे माझ्यात शिक्षणाबद्दल आवड निर्माण होत गेली. अशा माझ्या आदर्श शिक्षकाचे ऋण फेडण्यासाठी माझे मी त्यांनी दिलेला मार्गावरच वाटचाल करेन व त्यांचा विश्वास कधीही कमी न पडण्याचा माझा हट्टाहास आहे.

ज्यांनी जीवन जगण्याचा मार्ग दिला अश्या माझ्या जीवनाचे आदर्श डॉ. प्रविण सर यांना शतकोटी प्रणाम.

# माझे आदर्श शिक्षक निबंध



**प्राध्यापिका. सौ. वैशाली साहेबराव साळुंखे**

पत्ता - 29,श्री.गणेश कॉलनी गेंडामाळ नाका शाहुपुरी सातारा

आपल्याला आपल्या आयुष्यात यश मिळवण्यासाठी उत्तम मार्गदर्शन मिळणे गरजेचे असते . आपले आई-वडील आपल्याला चांगले संस्कार लावतात या स्पर्धात्मक जगात टिकण्यासाठी पालक मुलांना शाळेत पाठवतात. चांगले शिक्षण घेऊन आपण आपल्या आयुष्यात यशस्वी होतो.आपल्याला जर चांगले शिक्षक आणि संस्कार मिळाले नाही तर आपण आयुष्यात यशस्वी होऊ शकणार नाही.आपण जेव्हा शिक्षण घेत असतो तेव्हा कोणीतरी आपल्या आयुष्यात एक आदर्श व्यक्ती असते. आपण तिला आपला आदर्श मानतो.प्रत्येक विद्यार्थ्याला आदर्श शिक्षक लाभत असतात तसे मला ही लाभले . माझ्या कॉलेजमधील साळुंखे मॅडम ह्या माझ्या आदर्श होत्या. मी पाचवीपासून मॅडम यांना ओळखत होते .परंतु मॅडम ह्या कॉलेजला प्राध्यापिका होत्या. त्यामुळे माझी आणि त्यांची फारशी ओळख नव्हती मी कॉलेजमध्ये आल्यावर मॅडमना जवळून ओळखायला लागले. जसं जसं मी त्यांना ओळखत गेले तश्या तश्या त्या मला अधिक उलगडत गेल्या त्यांच्यातील प्रामाणिकपणा नीटनेटकेपणा हा मला खूप आवडतो.

मी त्यांना जेव्हा पाहिले तेव्हा मला त्यांच्यासारखे आपणही एक चांगली व्यक्ती चांगले आदर्श शिक्षक बनावं असे नेहमी वाटायचे. पहिल्यांदा आम्हाला मॅडम खूप कडक स्वभावाच्या वाटल्या परंतु तसे नव्हते .त्या जेवढ्या शिस्तप्रिय आहेत तेवढ्याच त्या प्रेमळ पण आहेत. मला माझ्या आयुष्यात ज्या व्यक्तीकडून काही शिकायला मिळाले त्यांचा मी नेहमीच आदर करत आलीये. परंतु त्या सर्वांमधून साळुंखे मॅडम यांना मी माझ्या गुरु मानते .साळुंखे मॅडम आम्हाला मराठी हा विषय शिकवत होत्या त्या शिकवायला लागला की त्यांच्याकडे ऐकतच राहावे असे वाटायचे मॅडम शिकवत असताना आम्हा मुलांची मनस्थिती जाणून घेत असत. मॅडम कधी वेळ मिळाला की प्रेरणादायी गोष्ट सांगून आमचा आत्मविश्वास वाढवायच्या एखादी गोष्ट किंवा कविता खूप छान प्रकारे सादर करत असत.मध्येच एखादा विनोद करून मुलांचे अवधान केंद्रीत करत. त्यामुळे विद्यार्थी हसत शिकण्याची मज्जा घेत असत .आणि असं शिकत असताना कधी कंटाळा येत नाही मॅडम जशा प्रेमळ तशाच शिस्तप्रिय सुद्धा आहेत. त्या वेळेला खूप महत्त्व देणाऱ्या आहेत. त्यांच्यामुळे मलाही वेळेचे महत्व समजले. मॅडमचा सर्व विद्यार्थ्यांना सोबत एक सारखा व्यवहार असायचा त्या कधी कोणासोबत भेदभाव करत नाहीत .

**"एक चांगला शिक्षक मेणबत्तीप्रमाणे असतो, स्वतः जळून विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळून टाकतो".**

त्यामुळे मला नेहमीच त्यांचा आदर  वाटतो. मी जेव्हा शिकत होते तेव्हा मॅडमचा तास कधी येतोय अशी वाट मी बघायचे .कारण शिकवत असताना विद्यार्थ्यांच्या शंका पण दूर करत  असत.आणि मुलांना काही मोलाचे मार्गदर्शन ही करत असत.

परिक्षेची तयारी करण्यासाठी मॅडम सर्व तयारी घेत असत .याचप्रमाणे ज्यादा तास पण घेत .शिक्षणासोबत मॅडम आम्हाला आमच्या भवितव्यासाठी कोणत्या गोष्टी गरजेच्या आहेत हे सुद्धा सांगत असायच्या. शाळेत जाऊन नुसतं शिकवणे म्हणजे तो शिक्षक नव्हे , तर त्यांच्या विचारांनी, मनाने, शिस्तेने, प्रामाणिकपणा ने आपले काम करतो तोच खरा आदर्श शिक्षक आणि साळुंखे मॅडम याचे एक चांगले आदर्श उदाहरण आहेत. त्या नेहमी उत्साही असायच्या कोणताही खेळ , स्पर्धा असो त्या नेहमी उत्साहाने स्वतः सहभागी होतात . आणि मुलांना पण भाग घ्यायला लावतात एक सूत्रसंचालक कसा असतो याचे एक चांगले उदाहरण त्या आहेत. त्यांचा आवाज खूप चांगला आहे त्यामुळे सूत्रसंचालन त्यांनाच करायला लागायचं आणि आम्हाला ऐकायला आवडायचं. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थी चांगल्या मार्कानें पास होतात.आमच्या कॉलेजचा नेहमी शंभर टक्के रिझल्ट लागायचा कॉलेजच्या सर्व कार्यक्रमात मॅडमचा खूप मोलाचा वाटा असायचा. 26 जानेवारी 15 ऑगस्ट हे कार्यक्रम जवळ आले की मॅडम पाच ते सहा दिवस आधीच आमची तयारी करून घेत असत. मॅडम अतिशय प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष आहेत शाळेतील सर्व कामे मॅडम अतिशय जबाबदारीने करत असतात. मॅडम आमच्या कॉलेजच्या स्वच्छतेकडे व विद्यार्थ्यांच्या गणवेशाकडे बारीक लक्ष असायचं . मी जेव्हा शाळा संपल्या नंतर या स्पर्धात्मक जगात स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करेन तेव्हा मॅडम यांचेही मार्गदर्शन मी नेहमीच लक्षात ठेवीन असं मला वाटायचं आणि ते मी अजूनही लक्षात ठेवले.माझे आई-वडील मला नेहमी सांगत असतात. आपण जीवनाच्या वाटेवर नेहमी काहींना काही शिकत असतो मी जेव्हा बारावीनंतर बाहेर पडले तेव्हा माझ्या मनात अनेक विचार आले की, मला साळुंखे मॅडम सारख्या मॅडम मिळतील का ? असे अनेक प्रश्न माझ्या मनात यायचे परंतु पुढील शिक्षणासाठी दुसरीकडे गेले तिथे मला चांगले मार्गदर्शक शिक्षक लाभले. त्यांचाही मी आदर करते अशा आमच्या प्रेमळ कर्तव्यदक्ष प्रामाणिक मॅडम यांना मी कधीच विसरणार नाही मॅडमच्या प्रेमळ स्वभावामुळे त्या माझ्या आदर्श शिक्षिका आहेत आणि नेहमीच राहतील.

**सामान्य शिक्षक सांगतात, चांगले शिक्षक स्पष्ट करतात, वरिष्ठ शिक्षक प्रत्यक्षिक करतात,**

**आणि महान शिक्षक प्रेरित करतात.**



**श्रीमती: जयश्री संतोष  जाधव**

**बी.एड प्रथम वर्ष**

**हजेरी क्रमांक  १४**

# माझे आदर्श शिक्षक

## शिक्षकाचे नाव- ता.का. सूर्यवंशी सर
## शाळेचे नाव- रा.सु.भो.विद्यालय शेंद्रे.

आपल्याला आपल्या आयुष्यात यश मिळवण्यासाठी उत्तम मार्गदर्शन मिळणे आवश्यक असते. आपले आई-वडील आपल्याला चांगले संस्कार लावतात. या स्पर्धात्मक जगात टिकण्यासाठी पालक मुलांना शाळेत शिक्षण घेण्यासाठी पाठवतात. चांगले शिक्षण घेऊन आपण आपल्या आयुष्यात यशस्वी होतो. आपल्याला जर चांगले शिक्षण आणि संस्कार मिळाले नाही तर आपण आयुष्यात यशस्वी होऊ शकणार नाही. शाळेतील शिक्षक आपल्याला चांगले संस्कार देतात. भरपूर गोष्टी आपल्याला शालेय जीवनात आपल्या शिक्षकांकडून शिकायला मिळतात. शिक्षणामुळे आपल्यामध्ये परिवर्तन घडते. आपल्याला जर प्रगती करायची असेल तर शिक्षण खूप महत्वाचे आहे. आपल्या आईवडिलांसारखेच आपल्याला वळण, संस्कार लावण्याचे काम शिक्षक करत असतात. कुंभार ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला आकार देतो त्याचप्रमाणे विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वाला सुरेख आकार देण्याचे महान कार्य शिक्षक करतात. आई ही प्रत्येकाचा पहिला गुरू असते त्यानंतर मला घडवण्याचे काम हे माझ्या शाळेने केले. शाळेत आपल्याला चांगले संस्कार दिले जातात हे फक्त आणि फक्त आपल्या गुरुद्वारा आपल्या वंदनीय आदरणीय शिक्षकाद्वारे शक्य आहे. शालेय जीवनात असतांना बऱ्याच शिक्षकांनी मला शिकवले आहे. पण माझे आवडते शिक्षक म्हणजे सूर्यवंशी सर आहेत. ते इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या वर्गाला शिकवतात. मी आठवीत गेल्यावर माझा पहिलाच दिवस होता आणि शिक्षक कडक असेल म्हणून मला थोडी भीती पण वाटत होती पण जसे सूर्यवंशी सर वर्गात आले तसा त्यांचा हसरा चेहरा बघून माझी सर्व भीती निघून गेली.

**"गुरुब्रह्म गुरूर्वविश्नी गुरुर्देवो महेश्वरा,**
**गुरू साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नम:"**

सूर्यवंशी सर हे माझे आवडते शिक्षक आहेत. ते उंच आहेत,गोरे आहेत.आणि ते कपाळावर नेहमी टिक्का लावत असत. त्यांचा स्वभाव हा नेहमीच हसरा, खेळकर शांत आणि गंमतीदार असे ते नेहमी चक्काचक असे स्वच्छ इस्त्री केलेले पांढरे शुभ्र शर्ट आणि काळी पँट घालत असत. त्यांचे बुट पण पॉलिश केलेले राहतात. हे सर्व त्यांची शिस्त.बघून आम्हाला पण योग्य आणि नीटनेटके राहण्याची सवय लागली. सूर्यवंशी सर,आम्हाला हिंदी, व्यक्तीमत विकास,हे विषय शिकवायचे . सूर्यवंशी सरांच्या शिकवण्याच्या पद्धतीने त्यांचे विषय आम्हाला सर्वात सोपे वाटू लागले.आमच्या शाळेला सूर्यवंशी सरांनी स्वछ सुंदर शाळेचा पुरस्कार मिळवून दिला.अनेक गरीब विद्यार्थ्यांना ते आर्थिक मदत सुद्धा करतात.कोणतीही अपेक्षा न करता ते मनापासून ज्ञान दानाचे पवित्र कार्य करतात. त्यांनी मला फक्त पुस्तकी ज्ञान दिले नाही, तर माझ्या आयुष्याला आकार देण्याचे मोलाचे कार्य केले. अश्या पाटील सरांसारख्या अष्टपैलू शिक्षकाची आज समाजाला नितांत गरज आहे. माझे आवडते शिक्षक श्री.सूर्यवंशी सर आहेत. ते सर्व विद्यार्थ्यांना नावासकट आणि प्रेमाने हाक मारतात. ते सर्व विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्याप्रमाणे शिकवण्याचा प्रयत्न करतात . ते सर्व विद्यार्थ्यांना समजेल आणि लक्षात येईल या पद्धतीने शिकवतात. शाळेत सूर्यवंशी सर सर्व विद्यार्थ्यांच्या आवडीचे आहेत. सूर्यवंशी सर सर्व विद्यार्थ्यांना आपलेच आहेत असे वाटतात. ते सर्वांशी आपुलकीने वागतात. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न आणि काळजी ते बरोबर जाणतात आणि त्या विद्यार्थ्यांच्या काळजीचे कारण दूर करतात. लहान विद्यार्थ्यांची काळजी कशी घ्यावी? याचे त्यांना पुरेपूर ज्ञान आहे .विद्यार्थ्यांना वाटणारी विविध विषयांतील भीती ते चुटकी सरशी दूर करतात. लहान विद्यार्थ्यांचे विविध प्रश्न ते जाणून असतात.

**" चिखलातला जन्मही सार्थकी लावावा निसर्गासारखा शिक्षक प्रत्येकाला मिळावा "**

SLB-Private

सूर्यवंशी सर संपूर्ण शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. शाळेबरोबरच संपूर्ण गावातही सूर्यवंशी सरांना आदराने बोलले जाते. विद्यार्थ्यांशी कसे वागावे याचे गुपित त्यांना ठाऊक आहे. विद्यार्थ्यांशी विद्यार्थी होऊन जाणारे श्री. सूर्यवंशी सर मला खूप खूप आवडतात. सर विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांमध्ये जसे भाषण स्पर्धा,खेळाच्या स्पर्धा,विविध संस्कृती कार्यक्रम यामध्ये भाग घेण्यास प्रोत्साहित करतात.या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना काही मदत हवी असल्यास, सर क्षणाचाही विलंब न लावता विद्यार्थ्यांना मदत करत असतात. शाळेमध्ये कोणताही उपक्रम राबवायचा असेल तर सर सर्वात पुढे असतात.शाळेमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात सरांचा मोलाचा वाटा असतो. शाळेमध्ये एखाद्या गरजूला मदत निधी गोळा करायची असेल तर सर सर्वप्रथम मदत देतात.सूर्यवंशी सर यांचा सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे,ते सर्व विद्यार्थ्यांना बोलते करून विद्यार्थ्यांच्या शंका कुशंका दूर करण्याचा प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांना वाटणारी शिक्षकाची भीती ते चुटकी सरशी नाहीशी करतात.विद्यार्थ्यांना शाळेविषयी कर्तव्य समजावून देण्यातते आघाडीवर असतात.सूर्यवंशी सर म्हणजे शिक्षणाचा जादूगारच होय म्हणून,मला सूर्यवंशी सर खूप आवडतात. सर हिंदी अध्यापक मंडळा चे काम करत असल्यामुळे आम्हाला मंडळाच्या स्पर्धा परीक्षा मध्ये भाग घेण्यासाठी नेहमी प्रेरित करत त्याविषयी लागणारे मार्गदर्शन ही करत. त्यामुळे आम्हाला निबंध लेखन, शुद्धलेखन, भाषण या सारख्या स्पर्धा न ची सवय झाली. असे सर आम्हाला लाभले याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. अश्या या माझ्या आदर्श शिक्षकाला वंदन करून मी माझा निबंध थांबवते.

"शिक्षक फक्त योग्य खडू आणि आव्हाने यांच्या मिश्रणासह जीवन बदलू शकतात."

**नाव - मनिषा शंकर पोतेकर.**
**हजेरी क्रमांक. -32**



SLB-Private

# माझे आदर्श शिक्षक



**डॉ. राजेश विष्णू येवले**

(इंग्रजी विभाग प्रमुख, चांगु काणा ठाकूर महाविद्यालय, नवीन पनवेल)

"गुरु ब्रह्मा, गुरु विष्णु, गुरु देवो महेश्वरा:,

गुरु साक्षात परब्रम्ह, तस्मै श्री गुरुवे: नमः"

जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी आपल्याकडे एक मार्गदर्शक असणे अत्यंत महत्त्वाचे असते.प्रत्येकाच्या जीवनात त्याला मार्ग दाखवणारा त्याला मार्गदर्शन करणारा असा एक तरी शिक्षक लागतोच आणि तो शिक्षक हा केवळ एक शिक्षक नसून त्या व्यक्तीसाठी तो एक आदर्श शिक्षक असतो. मुळात आदर्श म्हणजे अशी व्यक्ती जी आपल्याला मदत करते आणि आपल्याला त्यांच्या सारखे बनण्यास प्रेरित करते. एकंदरीत आपल्यावर चांगल्यासाठी प्रभाव पडणारे व्यक्ती ही आपल्या आदर्श असते.

माझ्या जीवनात असाच माझ्यावर प्रभाव टाकणारे आणि त्यांच्याप्रमाणे अनुकरण करण्यास प्रेरित करणारे आदर्श शिक्षक आहेत. काहींना त्यांचे आदर्श शिक्षक हे त्यांच्या सुरुवातीच्या जीवनात म्हणजे प्राथमिक, माध्यमिक स्तरावर भेटतात तर काहींना अगदी पदवी स्तरावर भेटतात. मला पण माझे आदर्श शिक्षक हे उच्च शिक्षणाच्या वेळी

जो मुलांचे मन जपतो तोच यशस्वी शिक्षक होय.

म्हणजेच कला शाखेच्या प्रथम वर्षी भेटले माझ्या आदर्श शिक्षकांचे नाव डॉ. राजेश विष्णू येवले असे आहे आणि मला पण त्यांच्या सारखेच बनायचे आहे. येवले सर हे गेली वीस बावीस वर्षे शिक्षण क्षेत्रात आहेत. चांगु काना ठाकूर महाविद्यालय पनवेल येथे इंग्रजी विभागाचे आणि सांस्कृतिक विभागाचे ते प्रमुख होते आणि आता पण आहेत.

येवले सर हे महाविद्यालयातील वेगवेगळ्या समित्यांमध्ये असल्यामुळे ते नेहमीच खूप व्यस्त असायचे पण त्यामुळे कधीच त्यांनी त्यांच्या पाठ्यक्रमाकडे दुर्लक्ष केले नाही. आपल्या सर्व कार्यक्रमांचे व्यवस्थित नियोजन करून ते आपला पाठ्यक्रम पण वेळेत पूर्ण करायचे.एवढ्या जबाबदाऱ्या असून पण त्यांनी सर्व जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडल्या आणि हेच त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे.

येवले सरांचा स्वभाव हा इतर सर्व शिक्षकांपेक्षा खूपच वेगळा आहे. त्यांची सर्वात चांगली गोष्ट म्हणायची झाली तर ती ही की संपूर्ण महाविद्यालयात अशी एकही व्यक्ती नव्हती ज्यांच्याशी सर बोलायचे नाही. सरांचा स्वभाव हा सर्वांना मदत करणारा, सर्वांना समजून घेणारा असा आहे. त्यामुळे महाविद्यालयातील प्रत्येक व्यक्तीसोबत त्यांचे चांगले संबंध होते. टीमवर्क कसे असावे, कसे सगळ्यांना सांभाळून घेत पुढे जावे, याचे अत्यंत ज्वलंत उदाहरण म्हणजे आमचे येवले सर.

डॉ. येवले सरांची शिकवण्याची, सांगण्याची पद्धत तर खूपच निराळी होती. सरांनी कधीच गंभीर होऊ शिकवले नाही. शिकवताना ते नेहमी वातावरण आनंदी आणि हसरे ठेवत. सर्वांसोबत ते खूप मोकळेपणाने वागत. कधी कोणावर रागवून, चिडून, किंवा अपमान करून ते बोलले नाही तिनेही मी प्रेमाने आणि शांतपणे समजावून सांगत आणि त्यांच्या याच स्वभावामुळे मी आणि बाकीचे सर्वच विद्यार्थी त्यांना आपलसं मानू लागलो होतो. आम्हाला त्यांची भीती वाटत नव्हती, मनामध्ये मात्र आदर हा नक्कीच होता. एखादी कविता, कादंबरी किंवा त्यातील काही विशिष्ट भाग जर समजला नाही तर सर परत तो भाग अजून वेगळ्या पद्धतीने शिकवायचे आणि समजावून सांगायचे

सर शिकवताना आपल्या रोजच्या जीवनाशी निगडित गोष्टींचा उदाहरण म्हणून वापर करत त्यामुळे एखादी गोष्ट आम्हाला पटकन समजायला मदत व्हायची.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणासंबंधी बोलताना म्हणाले होते की, -

"शिक्षक हा विद्यार्थी निष्ठा असावा. चांगला विद्यार्थीनिष्ठ शिक्षक हा

सहवासातून, आचरणातून, चारित्र्यातून मनाची श्रीमंती असलेला

कर्तबगार विद्यार्थी घडवू शकतो".

मिनीटांची काळजी घ्या, तास स्वतःची काळजी घेतील.

आणि मला वाटते की माझे आदर्श शिक्षक डॉ. आर. वी. येवले सर हे देखील असेच विद्यार्थीनिष्ठ आहेत डॉक्टर येवले सरांकडून जबाबदारपणा, योग्य नियोजन करणे, मदत करणे, विद्यार्थ्यांना योग्य पद्धतीने शिकवून आदर्श नागरिक घडवणे, एकमेकांना सहाय्य करणे आणि अशा बऱ्याच गोष्टी शिकण्यासारख्या आणि आचरणात आणण्यासारखे आहेत त्यांच्या या सर्व गुणांमुळेच डॉ. राजेश विष्णू येवले सर हे माझे आदर्श शिक्षक आहेत.




लेखन – इंगोले शीतल विजय

बी एड प्रथम वर्ष

हजेरी क्रमांक - १३

सुजाण नागरिक घडविणे हे शिक्षणाचे खरे ध्येय.

माझे आदर्श शिक्षक

## इंग्रजी भाषेची गोडी लावणारे शिक्षक...

श्री. पांडुरंग शंकर पडळकर

पेण शिक्षण महिला समितीचे सुमतीबाई विनायक देव प्राथमिक विद्यालय,

ता. पेण, जि. रायगड.

एक फुल बागेचा माळी म्हणून शिक्षक केवळ वनस्पतीच्या स्वरूपात असलेल्या विद्यार्थ्यांचे संगोपन करत नाही, तर त्यांना संस्कृतीच्या स्वरूपात फुले देऊन त्यांना चांगल्या माणसात वाढवून गुणांचा सुगंध सुद्धा देत असतो. आपले सामाजिक आणि मानसिक स्तर उंचावण्यासाठी शिक्षक खूप महत्वाची भूमिका बजावतात.

शिक्षक किंवा गुरू हे कुंभारासारखे असतात जे कुंभारकाम करताना ते एका हाताने हाताळतात आणि दुसऱ्या हाताने आकार देतात. त्याचप्रमाणे शिक्षकही आपल्याला शिस्तीने आकार देतात, जेणेकरून आपण चांगल्या भविष्याकडे वाटचाल करू.

माझ्या शाळेचे नाव 'पेण शिक्षण महिला समितीचे सुमतीबाई विनायक देव प्राथमिक विद्यालय, ता. पेण, जि. रायगड' म्हणजे पेण तालुक्यातील 'सुबोध शाळा' या नावाने प्रचलित असणारी शाळा .या शाळेत मी इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत शिकले. ह्या शाळेत लाभलेले पहिले आणि माझे आदर्श शिक्षक म्हणजे श्री. पांडुरंग पडळकर सर . हे सर इयत्ता पहिली पासून आमचे वर्ग शिक्षक होते व त्यांनी फक्त माझ्याच नव्हे तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या शालेय जीवनाचा पाया भक्कम केला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

आतापर्यंत घेतलेल्या पदव्युत्तर पदवी पर्यंत च्या शैक्षणिक प्रवासात अनेक शिक्षकांचा सहवास लाभला पण तरीही आदर्श शिक्षक म्हटले की फक्त पडळकर सर डोळ्यासमोर येतात.

आज मी इंग्रजी विषयात जे काही प्रभुत्व मिळवले आहे त्याचे संपूर्ण श्रेय सरांना जाते. आणि सरांनी इंग्रजी विषयात लावलेल्या गोडीचा फायदा मला इयत्ता पाचवी मध्ये सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत गेल्यावर झाला. पडळकर सर शिकवताना वर्गात वातावरण एकदम आनंददायी, खेळकर आणि प्रसन्न असायचे. त्यांनी अभ्यास हा कधीही सक्तीने करवून घेतला नाही याउलट हसतखेळत अभ्यास घेऊन अभ्यासाची गोडी वाढवली. आम्हाला चांगल्या गोष्टी शिकवण्याच्या अगदी सोप्या मार्गांनी प्रयत्न करतात.

आम्ही त्यांच्या वर्गाचा आनंद घ्यायचो. ते आम्हाला इंग्रजी विषय शिकवायचे. जेव्हा ते शिकवायचे , त्या दरम्यान खूप विनोद फोडून ते आम्हाला हसवायचे. नृत्य, क्रीडा, शैक्षणिक इत्यादी कोणत्याही शाळा किंवा आंतरशालेय स्पर्धेदरम्यान ते आम्हाला खूप चांगले मार्गदर्शन करायचे. इतर विषयांव्यतिरिक्त ते आम्हाला चांगले आचार शिकवायचे आणि शिष्टाचार देखील शिकवायचे जे आपल्याला चारित्र्यवान बनवतात.

ते नेहमी म्हणायचे की, जर तुम्हाला तुमच्या आयुष्यात खरोखर यशस्वी व्हायचे असेल तर तुम्ही तुमच्या शिक्षकांनी सांगितलेल्या गोष्टींची काळजी घ्या आणि आयुष्यभर त्यांचे पालन करा. ते कमकुवत आणि हुशार मुलांमध्ये भेदभाव करत नसत. ते कमकुवत मुलांना खूप आधार द्यायचे आणि हुशार मुलांना कमकुवत वर्गमित्रांना मदत करण्याची विनंती करायचे.

डोक शांत असेल तर निर्णय चुकत नाही, भाषा गोड असेल तर माणसं तुटत नाहीत.

पडळकर सरांविषयी कधीही न विसरता येणारी आठवण म्हणजे शाळेतर्फे पण शालेय वेळे व्यतिरिक्त घेतला जाणारा पेटंट इंग्लिश चा क्लास . माझ्या प्राथमिक शाळेतील आठवणींमध्ये सर्वात आनंददायी आणि मजेशीर आठवण म्हणजे हा क्लास.

इयत्ता तिसरी मध्ये असताना आमच्या शाळेमध्ये पेटंट इंग्लिश चा क्लास सुरू झाला. तेव्हा ह्या क्लास मध्ये अॅडमिशन घेऊ नका म्हणून खूप रडले होते ; पण आज जाणवते की त्या वेळी जर घरच्या लोकांनी हा हट्ट मान्य केला असता तर आज माझे खूप नुकसान झाले असते. नशिबाने त्या वेळी तीन बॅच मधून पडळकर सर मुख्य शिक्षक असलेल्या बॅच मध्ये माझा प्रवेश झाला.

ह्या क्लास मध्ये इंग्रजी मध्ये संवाद कसा करावा हे सर शिकवायचे, व नंतर सराव म्हणून जोडी मध्ये संवाद करायला सांगायचे. संवाद करण्याच्या वेळी माझा हजेरी क्रमांक शेवटचा असल्याने माझी संवादाची जोडी सरांसोबत असायची ; आणि मग सरांसोबत हसत खेळत , विनोद करत संवादाचा सराव करायचे. त्याच बरोबर वेगवेगळ्या प्रकारच्या खेळातून, कृती मधून सर इंग्रजी शिकवायचे. अक्षराचे उच्चारण कसे करायचे, अक्षर कसे लिहायचे याविषयी उत्तम मार्गदर्शन सरांकडून मिळाले आणि संपूर्ण शिक्षणात ह्या गोष्टींचा खूप फायदा झाला.

आजही जेव्हा कधी आमची भेट होते त्या वेळी सर अगदी प्रेमाने तिवरेकर अशी हाक मारतात तेव्हा आजही आपण त्यांना लक्षात आहोत याचा फार आनंद होतो. ते आपुलकीने सर्वांची चौकशी करतात. जेव्हा त्यांना समजले की मी बी. एड. ला प्रवेश घेतला आहे त्या वेळी सुध्दा त्यांनी खूप प्रोत्साहन दिले.

यापुढील शैक्षणिक जीवनात अनेक शिक्षक भेटतील पण पडळकर सरांची जागा कुठल्याही शिक्षकाला घेता येईल असे वाटत नाही. शिक्षण कधीच थांबत नाही परंतु यापुढेही मला पडळकर सरांसारखे प्रेमळ सर भेटतील का? ते मला समजून सांगतील का ? असे अनेक प्रश्न माझ्या मनात येतात.अशा आमच्या प्रेमळ, कर्तव्यदक्ष, प्रामाणिक सरांना मी कधीच विसरणार नाही. नेहमी त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून भविष्यात एक उत्तम शिक्षिका होण्याचा प्रयत्न नक्की करेन.



नाव :- श्रीमती. कोमल केशव तिवरेकर.

वर्ग :- प्रथम वर्ष बी. एड.

हजेरी क्रमांक:- ४४

# माझे आदर्श शिक्षक

# प्राचार्य डॉ. भास्कर झावरे सर

शिक्षक - शब्दांनी ज्ञान वाढणारे,

जगण्यातून जीवन घडवणारे,

मुल्यातून तत्वे शिकवणारे,

समाजाला योग्य दिशा दाखवणारे.

प्रत्येकाच्या आयष्यामध्ये शिक्षकांना अमूल्य स्थान असते. जीवनाच्या अवती भोवती जे जे असते ते ते जीवनाला येऊन भिडते, बिलगते, जीवनमय होते. अशाच एखाद्या शिक्षकाची प्रेरणा आपणास बिलगते व जीवन समृद्ध करण्यास मदत होते. व्यक्ती जन्माला येते त्यावेळेस ती कोणाची तरी कोणी ना कोणी असते.तिचे अस्तित्व तसे जन्मापासूनच सामाजिक असते. लहानपणापासून कानावर पडणारी भाषा ही मातृभाषा होते. माणसाच्या वाट्याला येणारे सामाजिक संदर्भ त्याच्या जीवनाला आकार देतात,ते त्याचे व्यक्तिमत्व होय.माणसाची मानसिकता सतत बदलत राहते. अनुभव, शिक्षण, सामाजिक संबंध यांच्या संयुक्त प्रभावातून तिचे अविष्करण व विकसन होते. व्यक्तिमत्व घडत असताना प्रेरणा देणारे अनेक शिक्षकरूपी महामानव आपणास भेटत असतात, त्यांची प्रेरणा जीवन प्रवाहात अंतर्भूत करणे अधिक उचित ठरते.

असेच शिक्षकरुपी मला भेटलेले रसायनशास्त्र चे प्राध्यापक प्राचार्य डॉ. झावरे सर. खरं तर मी स्वतःला खूप भ्याग्यवान समजते की, माझे काकाच माझे आदर्श शिक्षक आहेत. माझे महाविद्यालयीन शिक्षक जरी ते असले तरी कळत नकळत माझ्या बालपणापासूनच अगदी प्राथमिक गोष्टी त्यांनी मला शिकवल्या. पुर्ण आयुष्याला पुरेल अशी संस्काराची शिदोरी कुटुंबातील सगळ्याच पुढच्या वारसदार मुलांनाच नव्हे तर मुलींनाही दिली. बालपण स्वच्छंदी असते असं म्हणतात, परंतु स्वच्छंदी आयुष्यात बागडतानाही मुलांना मुलींना प्रार्थना श्लोक रामरक्षा,गणपती स्रोत या सगळ्या गोष्टी करत असताना वातावरण अगदी प्रसन्न असायचं. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण अतिशय उत्तमरीत्या पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी प्रवेश झाला तो म्हणजे न्यू आर्ट्स, कॉमर्स ऍण्ड सायन्स महाविद्यालय अहमदनगर येथे. प्रथम वर्ष विज्ञान विभागात माझा प्रवेश करण्यापासून ते पूर्ण होईपर्यंत सरांनी सगळे मार्गदर्शन केले. कोणत्या विषयाला काय महत्त्व आहे, काय करायला पाहिजे , काय पर्यायी विषय निवडायला पाहिजेत या सर्व बाबी मला व्यवस्थितपणे समजावून देऊन माझा प्रवेश बी.एससी प्रथम वर्षामध्ये घेतला तो ही सरांनी.प्रवेश घेतल्यानंतर माझे नियमितपणे महाविद्यालयात येणे, व्यवस्थितपणे परीक्षा देणे,निकाल लागणे या सर्व प्रथम वर्ष तसेच द्वितीय वर्षात पूर्ण झाल्यानंतर निकाल लागला. निकाल लागल्यानंतर माझ्यासमोर प्रश्न होता मी पर्यायी विषय कोणता निवडायचा तृतीय वर्षासाठी. खर तर हा प्रश्न घेऊन मी जेव्हा झावरे सरांकडे गेले तेव्हा त्यांनी मला अतिशय हळुवारपणे सांगितले की अग अर्चू आता काय विचार करते , रसायशास्त्र ला प्रवेश मिळू शकेल, तुला चांगले गुण आहेत. सरांच्या सांगण्यानुसार मी रसायशास्त्र विभागात प्रवेश घेतला विभागप्रमुख ते स्वतःच होते. प्रवेश घेतल्यानंतर नियमितपणे तासिका, प्रात्यक्षिक पूर्ण केले, तृतीय वर्ष मी प्रथम श्रणीत उत्तीर्ण झाले.महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पदवित्तोर शिक्षणाला प्रवेश कुठे घ्यायचा, कोणता विषय घ्यायचा,भविष्यात काय संधी आहे या सर्वांचे मार्गदर्शन करून माझा प्रवेश नौरोसजी वाडीया महाविद्यालय पुणे येथे एम. एससीला घ्यायचे ठरविले. माझा प्रवेश झाला , मी पुण्याला गेले, परंतु तिकडे गेल्यावरही सरांनी मला खूप मार्गदर्शन वेळोवेळी केले. एम. एससी पूर्ण करीत असताना सरांनी मला वेगवेगळ्या मुलाखतींचा माहिती दिली वेगवेगळ्या मुलाखती द्यायला तयार केले, त्यातील बारकावे समजावून सांगितले.मी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहमदनगर येथील पदवी महाविद्यालयाची जाहिरात आलेली बघितली होती.या जाहिराती बाबत सरांशी चर्चा केली असता सरांनी मला मुलाखत देण्यासाठी सांगितले होते, मी मुलाखत दिली, मुलाखतीमध्ये माझी निवड झाली. संस्थेच्या न्यू आर्ट्स कॉमर्स ऍण्ड सायन्स महाविद्यालय अहमदनगर येथील रसायनशास्त्र विभागात मी सहाय्यक पदावर रुजू झाले, काम करू लागले. रसायनशास्त्र विभागात काम करत असताना मी अतिशय प्रामाणिकपणे प्रात्यक्षिक समजावून सांगत मुलांना सोपे करत असे, तासिका घेत असे. विविध रसायनशास्त्राच्या बाबींवर सरांकडे जाऊन चर्चा करत असे. अशाप्रकारे माझ्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यास माझे काका त्याचप्रमाणे माझे शिक्षक, माझे विभागप्रमुख माझे मी विद्यार्थी असतानाचे प्राचार्य,तसेच प्रशासक असल्यामुळे या सर्व बाबींचा अनुभव मला सरांकडे मिळाला.जीवन समृद्ध करत असताना या सगळ्या गोष्टींचा मोठा सकारात्मक परिणाम माझ्यावर झाला आणि होतही राहील.

तुमचा आजचा संघर्ष हा तुमचे उद्याचे सामर्थ्य निर्माण करतो. त्यामुळे तुम्ही तुमचे विचार बदला म्हणजे तुमचे आयुष्य बदलेल.

झावरे सरांचा प्रशासक म्हणून अनुभवही मोठा आहे . प्रशासक म्हणून गेले 20 वर्ष ते सेवा देत आहेत.महाविद्यालयातील अनेक बाबींमध्ये ते तत्परतेने योगदान देतात .ग्रामीण भागातील विद्यार्थी त्याच्या जीवनाला आकार देता आला पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे.महाविद्यालयात शिकत असताना विद्यार्थांना व्यावसायिक शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी ते प्रयत्नशील असतात. विद्यापीठ अनुदान मंडळ, नवी दिल्ली अंतर्गत वेगवेगळ्या अभ्यासक्रमासाठी मान्यता मिळवून भरीव असे अनुदान मंजूर करून विद्यार्थ्यासाठी व्यावसायिक कोर्सेस महाविद्यालयात चालू केले आहेत. महाविद्यालय 2017 ला NAAC च्या तिसऱ्या सायकल मध्ये मूल्यांकन झाले तर पंचतारांकित महाविद्यालय म्हणून निवड झाली. सर नेहमी म्हणतात गुणवत्ता शहरावर अवलंबून नसते, खरी गुणवत्ता ग्रामीण भागात आहे. महाविद्यालयाला दोनदा एकांकिका स्पर्धेत पुरुषोत्तम करंडक मिळाला आहे असे सर आनंदाने सांगतात त्यामागील विद्यार्थ्यांबरोबरच त्यांचे कष्ट याचा उल्लेख ते करतात.गुणवान विद्यार्थ्यांमुळेच प्रामाणिक कष्टाळू प्राध्यापकानांमुळे महाविद्यालयाला एवढ्या उंचीवर पोहचता आले असे ते नेहमी सांगतात. मला स्वतःला आनंद वाटतो की,मला मार्गदर्शन मिळवण्यासाठी कधी त्यांना शोधावं लागलं नाही. मला सहजतेने ते त्यांचा वेळ द्यायचे जणू कुटुंबातच माझा रसायनशास्त्र विभाग होता, महाविद्यालय होत, माझे शिक्षक होते. या सर्व गोष्टींमुळे सर माझे आदर्श शिक्षक आहेत.

आदर्श शिक्षकांच्या प्रेरणा घेऊन वेगळे काही करण्याचा प्रयत्न केला ती माणसे आदर्शवत झाली. मार्गदर्शनाची गरज प्रत्येकाला असते. मात्र मार्गदर्शन घेताना तारतम्य बाळगावे लागते.कोणाला तरी गुरू करणे, त्याला माहित नसलेल्या विषयावर त्याचे मत विचारणे व स्वतः विचार न करता ते भाबडेपणाचे स्वीकारणे चुकीचे आहे. वाचत राहणे, शोधत राहणे, कामात गुंतून राहणे, प्रयत्न करणे हे गुण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी अंगीकारले तर आपोआप जीवनाच्या वेगवेगळ्या वळणावर आदर्श तसेच प्रेरणा देणारी व्यक्त भेटते...

चांगला गुरु यशाचे दरवाजे उघडून देऊ शकतो. पण त्यातून यशाच्या दिशेने जाण्यासाठी स्वतःलाच चालावे लागते.



झावरे अर्चना भास्कर

बी. एड ( प्रथम वर्ष )

हजेरी क्र. ४८

# माझ्या आदर्श शिक्षिका

प्रा. पिंपरे-महाजन मॅडम.
(जी.टी.पी. महाविद्यालय, नंदुरबार).



*"गुरुने दिला ज्ञानरूपी वसा,*
*आम्ही चालवू हा पुढे वारसा "*

या जगदीश खेबुडकरांच्या ओळी खरचं मला माझ्या आदर्श शिक्षकांनी घालून दिलेला ज्ञानरूपी वसा पुढे घेऊन आयुष्यात यशस्वी वाटचालीसाठी प्रेरणादाई ठरल्या आहेत. शिक्षकाचं व्यक्तीमत्व अष्टपैलू असावे. जन्मापासून आपल्या आयुष्यामध्ये प्रत्येक उबरठंयावर अनेक व्यक्तीमत्व गुरूंच्या स्वरूपात आपल्याला लाभत असतात तसे पाहता पहिला गुरू हि आपली आई असते तिच्या मार्गदर्शनाने आपल्या आयुष्याची सुरूवात होते.

प्रत्येकाच्या आयुष्यात एखादा असा शिक्षक असतो की त्या शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम आपल्यावर नकळत होतो. त्या शिक्षकाच्या प्रत्येक गोष्टीचे अनुकरण आपण करू लागतो व शिक्षकाशी आयुष्यभरासाठी आपली एक वेगळीच नाळ जोडली जाते. माझ्या आयुष्यात देखील अशी एक व्यक्ती, असे एक शिक्षक येऊन गेलेत की ते माझ्यासाठी आदर्श ठरले नेमकं आदर्श म्हणजे कस तर ज्यांनी माझ्यातल्या असलेल्या गुणाची, चांगल्या गोष्टीची जाणीव मला करून दिली ती अस सांगून मुळीच नाही. अप्रत्यक्षरित्या त्यांच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव माझ्यावर पडत गेला मी स्वतः मला, माझ्यातील गुणांना ओळखायला लागले.

माझ्या आदर्श शिक्षिका म्हणजे प्रा. पिंपरे महाजन मॅडम आमची भेट ती झाली बारावीनंतर पदवीच्या पहिल्या वर्षात पाहता क्षणीच त्यांच्या निर्भिड, धाडसी, कणखर, शिस्तप्रिय, स्वभावाचा मला हेवा वाटला. हळूहळू जसे पदवीची वर्षे उलटू लागली तशी जवळीकता वाढत गेली. जी. टी. पी महाविदयालय,नंदुरबार

*'' कर्तुत्वाची भरारी माणसाला अमरत्व मिळवून देते "*

येथील प्राध्यापक असलेल्या आमच्या मॅम गणित विषय शिकवत असत. खास बाब म्हणजे गणित अगदी अंगात भिनल्यासारख वाटायच त्यांच्या कधी आमची परिक्षा जवळ आली तर परिक्षेचा हॉल उघडेपर्यंत आमच्या हातातून पुस्तक पडायचे नाही. तेव्हा मॅम एकच सांगायच्या परिक्षा गणिताचा अभ्यास यात इतके घाबरून जाण्यासारख काही नाही मुळात गणित विषय हसत खेळत अभ्यास करायचा विषय मग ते त्यांच्या शाळेतील कॉलेजमधील केलेल्या अभ्यासाच्या प्रसंगाचे वर्णन करून मार्गदर्शन करून दिलासा देत. त्यांच बोलण ऐकून खूप उत्साह, बळ संचारल्यासारख व्हायचं आणि त्या स्वत: हु त्यांच्या माळी समाजातील तळोदा या नंदुरबार मध्ये असलेल्या गावातील पहिल्या प्राध्यापिका आहेत.

मॅडमांनी मुलींना कायम प्रेरणा दिली शिक्षणासाठी मागे सरायचं नाही काहीतरी ध्येय निश्चित करायचं आणि ते पूर्ण करायचं काही बाबी त्यांच्याबद्दलची आत्मीयता शब्दांत मांडणे अशक्य एका शिक्षकी पेशा पत्नीकडे, एक मैत्रीण, तसेच एक उत्तम शिक्षक व आज मी इथपर्यंत आहे त्यास कारणीभूत आहेत म्हणजे मॅमचे विचार ते सोबत अहेत असतील तो पर्यंत शिक्षणाचा प्रवास असाच सुरु राहील.



**लेखन–** प्रतिज्ञा मोहन कोडग

(छात्र अध्यापिका)

बी. एड. प्रथम वर्ष

हजेरी क्रमांक– 17


*"पुस्तके वाचून पोहायला येत नाही त्यासाठी पाण्यात पडून हात पाय हलवावे लागतात "*

*" हास्य हे जीवन वृक्षाचे फुल आहे परंतु अश्रू हे त्याचे फळ आहे. "*

## माझे आदर्श शिक्षक

### नाव : हेमराज सांळूखे सर.

### ( मराठी व राज्यशास्त्र विषय शिक्षक )



प्रत्येकाच्या आयुष्यात त्यांचे आई-वडील हे पहिले गुरु असतात ते आपल्या मुला-मुलींवर चांगले संस्कार करून घडवितात पण आपण जेव्हा शाळेत प्रवेश करतो तेव्हा आपण आपल्या घरातील छोट्याशा जगातून शाळा, कॉलेजातल्या वातावरणात प्रवेश करतो आणि यामध्ये शाळेचे, कॉलेजचे शिक्षक आपल्याला योग्य मार्ग दाखवतात. माझे १ ली ते ४ पर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषद कासा शाळेत येथे झाले. त्यानंतर ५ वी ते १० वी मी ज्या शाळेत शिकत होती, त्याच शाळेत ज्युनिअर कॉलेजचे शिक्षण झाले. त्याचे नाव होते "पूज्य आचार्य भिसे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कासा" येथे शिक्षण घेताना मला ५ वी ते १२ वी पर्यंत अनेक चांगले आदर्श शिक्षक मिळाले त्यातील "माझे आदर्श शिक्षक" इयत्ता ११ वी १२ वी इयत्तले "साळुंखे सर" आहेत.

साळुंखे सर हे ११ वी १२ वी या इयत्तेत आम्हाला 'मराठी' आणि 'राज्यशास्त्र' विषय शिकवत. त्याचा स्पेशल विषय मराठी आहे. मराठी विषयाची आवड मला इयत्ता १२ वीत असताना साळुंखे सरांमुळे निर्माण झाली. त्यांची शिकवण्याची पद्धत, एकदम सहज सोपी भाषा, ते वापरत असत आम्हाला कवितेचा, धड्याचा अर्थ , सार समजून सांगत असत. याआधी मराठी विषय आवडत नव्हता असे नाही, परंतु सांळूखे सरांच्या शिकवण्याच्या पद्धतीमुळे मराठी विषयाची अधिक आवड निर्माण झाली. अगदी धडा, कविता ते व्याकरण अगदी सहज सोप्या रोजच्या जीवनातील चित्रपटांमधील उदाहरणे देऊन ते शिकवत असत. ते एकदा का एका विषयावर बोलायला लागले की काय थांबत नसत. दुसऱ्या तासाची वेळ होऊन शिक्षक आल्याशिवाय त्यांच्या शिकवण्याला विराम मिळत नसे. सुरुवातीला तर मला या सर्वांचा कंटाळा येत असे, परंतु जसजसे सर नवनवीन गोष्टी विनोदी प्रसंग , आम्हाला कठीण वाटणाऱ्या गोष्टी, अगदी सहज सोप्या भाषेत शिकवत. तसतसे त्यांच्या तासाची मी वाट पाहत असे त्यांनी सांगितलेल्या विनोदी गोष्टींमुळे वेळेचे भान मला नसे, एवढ्या लवकर कसा तास संपला? असे मला वाटायचे.

याचीच एक आठवण म्हणजे बारावीला आम्हाला "भुताचा जन्म" हा धडा होता. तो धडा माझ्या कायम स्मरणात राहील, तो धडा शिकवताना सरांनी चांगले तीन ते चार दिवस लावले होते, तो धडा कधी शिकून होऊच नये असे त्यावेळी मला

**जो काळानुसार बदलतो तोच नेहमी प्रगती करतो.**

Edit with WPS Office

वाटायचे, कारण त्या धड्याची पश्वभूमी ही ग्रामीण जीवन वास्तव्याची अभिव्यक्ती, प्रत्ययकारी वातावरण निर्मिती, विनोद निर्मिती इत्यादी. गोष्टी यामध्ये होत्या. ग्रामीण भागातील लोकांच्या मनामध्ये अंधश्रद्धेने किती घर केले आहे, याची विनोदी चित्रण त्या धड्यांमध्ये होते. तो धडा वाचतानाच वर्गातील सर्वांचे हास्य फुटले होते. त्यात सरांनी तो धडा शिकवताना भुतांच्या विनोदी गोष्टी सांगून गंभीर विषय विनोदी स्वरूपात मांडून अगदी विनोदी स्वरूपात शिकवला होता.

मराठी सोबतच ते राज्यशास्त्र विषय शिकवत. सुरुवातीला राज्यशास्त्र विषय मला थोडा कठीण वाटत होता, कमी मार्क्स पडत असल्यामुळे मला तो विषय नावडीचा होता, परंतु साळुंखे सरांनी इतक्या चांगल्या प्रकारे विषय शिकवला की त्याचा आता सुद्धा फायदा होतो. सोप्या पद्धतीने मुद्द्यांच्या स्वरूपात समजून सांगून शिकवला. त्यामुळे नावडीच्या विषयातच बारावीला मला सर्वात जास्त मार्क पडले. त्याचे सर्व श्रेय साळुंके सरांना जाते. प्रश्नांची उत्तरे कशी मांडावी. आपल्या उत्तरांमध्ये इतरांच्या उत्तरांपेक्षा वेगळेपण कसे आणावे, हे ते उत्तम प्रकारे समजून सांगत, शिकवत.

आम्ही शिकत असलेल्या जुनियर कॉलेजात हे इयत्ता ५ वी ते १० वी या इयत्तेपर्यंतचे वर्ग होते. त्यामुळे आम्हाला त्यांची कडक शिस्त पाळावी लागत होती. ते आम्हाला म्हणत, तुम्ही मोठे आहात तुमचे अनुकरण लहान करतील. त्यामुळे मला तरी जुनियर कॉलेजचे दिवस हे ९ वी १० वीतले असल्यासारखे वाटात होते. मी शिक्षण घेत असलेला भाग हा ग्रामीण त्यामुळे बहुतांश विद्यार्थी गरीब, त्यांच्या विचार करून ते खर्चिक पडेल असे अभ्यासातील प्रकल्प सांगत नसत.

माझ्या आठवणीतील एक प्रसंग म्हणजे साळुंके सरांनी "एक दिवसासाठी आमच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षक होऊन धडा, कविता जे शिकवायचे ते शिकवायला सांगितले होते". त्यावेळी मी एक धडा शिकवला होता समोर जाऊन काय बोलावे मला काहीच सुचत नव्हते, सरांनी आम्हाला पूर्ण सूट दिली होती. त्यावेळी मी सर ज्याप्रमाणे शिकून प्रश्न विचारत, आमच्या वर्गातील हजेरी नंबर १ ला ते नेहमी उत्तर देण्यासाठी उठवत असत. त्याचप्रमाणे मी सुद्धा त्यांचे अनुकरण केले. वर्गातील सर्व विद्यार्थी आणि साळुंखे सर या प्रसंगावर खूप हसले होते. हा प्रसंग माझ्या नेहमीच आठवणीत राहील. सरांनी प्रोत्साहन दिल्यामुळे कधी सरांसमोर कोणत्याही गोष्टीचे दडपण आले नाही.असे माझे आदर्श शिक्षक सांळूखे सरा यांची शिकवण नेहमीच माझ्या स्मरणात राहील.

---



लेखन - भावना शिवराम भगत.

बी.एड प्रथम वर्ष.

हजेरी क्रमांक - 1.

संकटं टाळणं माणसाच्या हातात नसतं, पण संकटांचा सामना करणं, त्यांच्या हातात असतं.

Edit with WPS Office

## "माझे आदर्श शिक्षक"



**श्रीमती. चिंदरकर बाई**

**शाळेचं नाव - अनुयोग विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खार (पूर्व)**

**गुरुविण न मिळे ज्ञान, ज्ञानाविण न होई जगी सन्मान..**

**जीवन भवसागर तराया, चला वंदु गुरूराया..**

शिक्षक म्हटल्यावर डोळ्यासमोर एक आदर्श व्यक्तिमत्व उभारतं. या आणि अश्या प्रकारच्या व्यक्तिमत्वानीं माझ्या मनावर खोलकर परिणाम केला. त्यापैकी एक व्यक्ति म्हणजे माझ्या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती.चिंदरकर बाई. इयत्ता ५वी पासुन मांझी शाळा बदली आणि आयुष्य ही. माझ्या शालेय जीवना विषयी सांगताना भुतकाळातील सर्व आठवणी जिवंत झाल्या. इयत्ता ५ वीत असताना शाळेतुन तक्रार घरी पोहचली ती म्हणजे मी वर्गात शिकवताना लक्ष देत नाही आणि सतत गप्पा मारत असते आणि हे खरें होते.

शिक्षा म्हणुन आई समोरच चिंदरकर बाईंनी माझ्या दोन्हीं तळ हातावर रूलरने पाच-पाच फटके मारले आणि मुलान मध्ये बसवलें. या घटनेने मला लाज म्हणुन का होईना शांत केले.

त्यानंतर मी एवढी शांत झाले की वर्गातील इतर मुली माझ्या बरोबर मौन रहायची स्पर्धा लावु लागल्या. पण माझं मन सतत आमच्या चिंदरकर बाईंना शोधत असायचं कारण मी आता किती शांतपणे वर्गात बसते हे दाखवायचं होतं. आमच्या नकळत बाई नेहमी आम्हा विद्यार्थ्यानं वर लक्ष ठेऊन असायच्या पण आम्हा मुलांना ते कधी कळालच नाही. पण मला हे गुपित कळालं. ते कस बर? कारण जेव्हा कधी शाळेच्या आवारात बाईंच्या नजरेस नजर व्हायची त्या थांबवुन काहीतरी प्रश्न विचारायच्या आणि मी दबकुन जायचे. चिंदरकर बाईंच्या पाच फटक्यांच बाळकडु माझ्या आयुष्याचं ध्येय ठरवुन गेलं

**माझे तुम्ही आदर्श आहात आणि माझ्यासाठी तुम्ही सर्वोत्तम शिक्षक आहात.**

शिक्षक नेहमीच विद्यार्थी घडवतात वं माझ्या बाबतीत हे खरं ठरलं. मी चिंदरकर बाईंशी कधीच मोकळेपणाने बोलले नाही पण माझ्यातील बदल मला सतत त्यांची आठवण करुन देत राहिला. मी इयत्ता ८ वीत आले शाळेचें अधिवेशन बदलले त्यामुळे चिंदरकर बाईंशी जास्त संपर्क येत नव्हता.

त्यावेळच्या माझ्या मनात शिक्षक ही प्रतीमा आणखी उंचावली. चिंदरकर बाईंच्या व्यक्तिमत्वाची छाप माझ्या मनात इतकी खोलवर रुजली गेली की मी भविष्यात शिक्षक होण्याचा निर्णय घेताला.

पुढे शिक्षण पूर्ण झालें पण लग्न, संसार आणि मुलाच्या जबाबदारी मुळे शिक्षक होण्याच्या इच्छेला ब्रेक लागला पण म्हणतात ना इच्छा तेथे मार्ग आणि आज मी विद्यार्थी शिक्षिकेच्या भुमिकेत तुमच्या समोरच आहे. तर असे असतात शिक्षक जे कळत-नकळत आपल्या आयुष्याला कलाटणी देतात. इयत्ता ५ वीत घेतलेली ती माझी पहिली आणि शेवटची शिक्षा.

श्रीमती चिंदरकर बाईंना शत् शत् प्रणाम. देव त्यांना उदंड आयुष्य देवोत.

## शिक्षक रुपी बाळकडु, ज्यांनी माझं शिक्षक रुपी जीवन दिलं घडु



नावः मिनाक्षी मनोज चव्हाण
बी. एड् प्रथम वर्ष
हजेरी क्रमांकः ७

# माझे आदर्श शिक्षक



प्राध्यापक रत्ना कुवरा

" गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णः गुरुर्देवो महेश्वरा:

गुरु साक्षात परब्रम्हः तस्मै श्री गुरुवे नमः"

ज्ञानाची गोष्ट वा चांगला संस्काराची ते घडवण्याची काम हे शिक्षक करीत असतो. माझ्या आयुष्या मध्ये अनेक शिक्षकांनी मोलाचे मार्गदर्शन केले परंतु आदर्श शिक्षक म्हणून कुवरा सर आहेत .त्यांचे विषय गणित आणि विज्ञान होते नावाप्रमाणे त्यांचे शिस्तबद्ध आणि कडक होते.जेव्हा आम्ही पाचवीला गेलो तेव्हा कुवरा सर आमचे वर्ग शिक्षक होते कडक शिस्त आणि शिस्तप्रिय असे त्यांचे राहणीमान होते .सरांना कोणतेही काम वेळेवर केलेल्या आवडत असे आम्ही पाचवीला पहिले दिवशी वर्गात गेलो सरांनी त्यांची ओळख करून दिली त्यानंतर आम्हाला पाढे विचारले मला दहा पर्यंत पाढे येत होते परंतु सर कडक शिस्तीचे असल्यामुले मला काहिच जमलं नाही.सरांना बघितलं तरी सुद्धा अंगाला घाम यायच्या असं वाटायचं की सर आज आले नसते तर बरं झालं असतं. कारण आम्हाला पहिली ते चौथीपर्यंत कोणतेच शिक्षक नव्हते त्यामुळे आम्हाला काही जमत नव्हते. त्यामुळे सरांनी आम्हाला सुरुवातीपासून शिकवायला सुरुवात केली. जसे की आपण घर बांधणार आहोत परंतु जर त्या घराचा पाया पक्का नसला तर ते घर कोसळत असते त्यांनी आमच्या सुरुवातीला पाया पक्का केला .

सरांना कोणतीही गोष्ट वेळेवर केलेले आवडते जर का कोणी केली नसेल तर त्याला डोक्यावर दप्तर ठेवून मैदानामध्ये धावायला सांगत असे त्यामुळे सगलेच काम वेळेवर करीत असत. अनेक

**"आवड व आत्मविश्वास असेल तर कोणतीही गोष्ट अवघड नाही"**

विद्यार्थी शाळा सुद्धा सोडून गेले होते. त्यांच्या हातातून नेहमी आदर्श विद्यार्थी घडले त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला मोलाचे मार्गदर्शन केले ते PT शिक्षक सुद्धा होते खेळामध्ये राज्यस्तरी खेळाडूंना मार्गदर्शन करीत असे त्यांच्या हाताखाली अनेक विद्यार्थी आता पोलीस ,शिक्षक आणि अनेक वेगवेगळ्या ठिकाणी जॉबला आहेत त्यांना कोणतेही वेळेला फोन लावला तरी माहिती सांगत असतात बाहेरून कडक तेवढेच आतून मनमिळाव स्वरूपाचे होते परंतु जर का कोणी चुकी केली तर शिक्षा मात्र दयायचे.त्यांच्या पुढे कोणाचीच बोलायची हिंमत नसे. त्यांच्या बघण्याच्या दृष्टीकोन हा प्रत्येक विद्यार्थी पुढे समान होता. कोणामध्येच भेदभाव केला नाही उदाहरणार्थ जर का एखाद्या विद्यार्थ्याला अडचण आली तर त्याला समजावत असे आणि त्यांच्याकडे जास्त लक्ष देत होते मुलांना चांगलं समजा व त्यासाठी उदाहरण सह स्पष्ट करीत असे. कंटाळा आला तर गोष्टी सांगत असत. कधीकधी मैदानामध्ये नेऊन विविध खेळ खेळवत होते.बोलतात ना

" मूर्ती लहान पण कीर्ती महान "

26 जानेवारी आणि 15 ऑगस्ट ला मोलाचे मार्गदर्शन करतात. तसेच ०९ ऑगस्टला "आदिवासी दिवस" मोठ्या उत्साहात सरांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करतात. जर का कोणी गैरहजर राहिले तर पालकांना बोलावून घेत असत आणि त्यांना शिक्षा म्हणून ५०० इंग्लिश शब्द लिहायला लावत असे.



प्रियंका जानू भोये

बी. एड प्रथम वर्ष

हजेरी क्रमांक:०५

**"कला म्हणजे सत्य शिव, आणि सुंदर यांचे संमेलन".**

# माझे आदर्श शिक्षक



नाव:- सुधीर गरड सर

मोबाईल नंबर :- ९८६००१२८३२

प्रथमता आज पर्यंत लाभलेल्या सर्व सन्माननीय गुरुजनांना माझा प्रणाम. आता प्रश्न पडतो तो म्हणजे आजपर्यंतच्या शिक्षणामध्ये असे कोणते, शिक्षक आपल्याला आदर्श लाभले. खर तर सर्व शिक्षक आदर्शच असतात. पण आता निबंधाचा विषय जर माझे आदर्श शिक्षक व तेही एकच अशीच अट आहे तर त्यामध्ये प्रामुख्याने मला सन्माननीय गुरुवर्य सुधीर गरड सर यांचा उल्लेख करावा असे वाटते. यांच्या बद्दल थोडक्यात माहिती.

सध्या एस. के. एस. कॉलेज औसा, लातूर येथे कार्यरत आहेत. म्हणजेच माझे पदवीचे शिक्षण ज्या महाविद्यालयात झाले तिथेच कार्यरत आहेत. यांचा प्रवास मला बी ए ला प्रवेश घेण्याच्या अगोदर लाभला तो म्हणजे बी.ए विषय निवडण्याचा वेळी.प्रत्येक जण एक आदर्श शिक्षक म्हटले म्हटले की चिंतेत पडतो की कोणते शिक्षक निवडावे कारण आज सरासरी सर्वजण पदवी किंवा पदव्युत्तर पदवी पर्यंत शिक्षण घेत आहेत त्यामध्ये कितीतरी शिक्षक एका विद्यार्थ्याला लाभत असतात. तरी देखील हे शिक्षक मला आदर्श म्हणून निवडताना थोडी चिंता किंवा विचार करण्याचे काम पडले नाही त्यामागे तसेच कारणही आहे ते म्हणजे,शिक्षक या नात्याने ते त्यांचे कर्तव्य चौकपणे पार पाडायचे म्हणजेच वेळेला महत्त्व द्यायचे, त्याचबरोबर जबाबदारीने आपल्या तासिका घेणे, विद्यार्थ्यांना आपण आज काय शिकविले यापेक्षा काही समजले याला ते महत्त्वाचे समजत, शांत स्वभाव, संयमी कर्तुत्व, चांगले वक्तृत्व स्पष्ट आवाज, या सर्व कारणामुळे एस. के. एस कॉलेज मधील सर्व शिक्षकांमध्ये एकमेव असे शिक्षक जे की बहुतांश कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना पाहावयास मिळाले.त्यांच्याकडून आदर्श म्हणून मला भरपूर गोष्टी शिकण्यास भेटल्या त्यामध्ये त्यांच्या सहवासात असताना असे जाणवले की, ते कायम कोणत्याही विद्यार्थ्यांची अडचण जाणून घेऊन त्याला एक उत्तम मार्ग दाखविण्याचे कार्य करायचे उदाहरणार्थ. माझा मित्र

गणेश याला कॉलेजमधून मार्क मेमो देत नव्हते, तेव्हा त्यांनी त्याला कोणत्या प्रकारचा अर्ज करावा जेणेकरून तुला मार्क मेमो भेटेल हे सांगितले व त्यांच्यामुळे त्याला मार्क मेमो भेटला. आजही ते त्याच कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. व मला नक्कीच खात्री आहे की ते भरपूर जणांचे आदर्श शिक्षक असतील.त्यांचा स्पष्ट आवाज भाषा रचना किंवा शब्दरचना हे एक प्रत्येकाच्या जीवनाला कलाटणी देणारी आहे म्हणूनच आजही कॉलेजमधील बहुतांश नव्हे तर प्रत्येक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ते करताना पाहावयास मिळतात.त्यांचे काव्यवाचन म्हणजे एक त्यांना लाभलेले वरदान म्हणावे लागेल कारण ते जेव्हा कवितेचे वाचन करायचे तेव्हा वर्गात असूनही, ते जे सांगतात किंवा ते बोलतात तिथे असल्याचा भास मला व्हायचा. उदाहरणार्थ, एखाद्या नदीवर किंवा सुंदर ठिकाणावर आधारित काव्यरचना असतील तर मला असे वाटायचे मी साक्षात त्या ठिकाणी आहे. त्याचे कारण ती भाषा स्पष्टता व गोड आवाज हेच मूळ कारण असायचे. नंतर त्याच्या भावना यावर बोलायचे झाले तर वर्गात प्रेमावर आधारित काव्यरचना असतील तर सर्वांना प्रेम भावाच्या मोहात आहे असे वाटायचे, वीरतेवर आधारित काव्यरचना असली तर सर्वांचे रक्त सळसळ करावे अशी त्यांची भाषा रचना असायची.त्यांची तासिका असली की वर्गामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी संख्या पहावयास मिळत, त्यांची ताशीका संपली जणू काही भूकंप झाला अशा प्रकारे वर्गातील विद्यार्थी बाहेर निघून जायचे त्यातलाच मी एक. त्यांचा आदर्श पुढे ठेवून मी देखील त्यांच्यासारखा आदर्श शिक्षक बनण्याचा नक्कीच प्रयत्न करीन.

त्यांचा विषय मराठी असल्यामुळे व ते माझे आदर्श शिक्षक असणे, या कारणामुळेच आज मी मराठी मध्ये पदवी केली त्याचबरोबर पदव्युत्तर पदवी तिही मराठी मध्ये, व शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे मराठी या विषयात बीएड करत आहे असे मला वाटते.आता प्रश्न येतो तो म्हणजे योगायोग कारण मला मराठी या विषयातील प्राध्यापक डॉक्टर खाडे सर जे की त्यांच्यासारखे लाभले, असो आपला विषय एकाच शिक्षक शिक्षकांचा आहे.शेवटी मला प्रामुख्याने प्राध्यापक डॉक्टर बी.जी खाडे सर यांचा आभार मानावा असे वाटते, कारण त्यांनी मला माझ्या आयुष्यातील आदर्श शिक्षक त्यांच्याबद्दल दोन शब्द लिहिण्याची संधी निर्माण करून दिली. व त्यांनी निबंधाचा विषय हा माझे आदर्श शिक्षक ठेवण्यामागचे कारण मी नक्कीच समजू शकतो. ते म्हणजे आपण सर्व छात्र अध्यापक आपल्या आदर्श शिक्षकासारखे बनावे व पुढील पिढ्यांचे भविष्य उज्वल करावे, असा उद्देश पुढे ठेवूनच या विषयाची निवड प्राध्यापक डॉक्टर खाडे सर यांनी केली असावी..

धन्यवाद>>

**गुरुने दिला ज्ञानरुपी वसा**

**आम्ही चालवू हा पुढे वारसा**

नाव :- करण लिंबराज गरड.



# माझे आदर्श शिक्षक

## को . ए.सो माध्यमिक विद्यामंदिर शाळा शहाबाज

## शिक्षकांचे नाव:- केशव रणपिसे सर

आमच्या शाळेतील सर्वच शिक्षक अतिशय हुशार आणि प्रेमळ आहेत. सर्व शिक्षक आम्हाला भरपूर ज्ञान देतात. माझ्या शाळेतील रणपिसे सर हे माझे आदर्श शिक्षक आहेत. मी इयत्ता सातवीमध्ये असताना सर दुसऱ्या शाळेतून बदली होऊन आमच्या शाळेमध्ये आले. पहिल्यांदा आम्हाला सर कडक स्वभावाचे वाटले परंतु तसे न्हवते. रणपिसे सर स्वभावाने अतिशय प्रेमळ आहेत. मला माझ्या आयुष्यात ज्या व्यक्तीकडून काही शिकायला मिळते त्यांना मी माझे गुरू मानते. जसे माझे आईवडिल माझे गुरू आहेत तसेच रणपिसे सरांना मी माझे गुरू मानते. रणपिसे सर आम्हाला गणित विषय शिकवतात. सरांची शिकवण्याची पद्धत अतिशय सोपी असल्यामुळे आम्हाला समजून घेण्यास सोपे जाते.

सर शिकवत असताना आम्हा मुलांची मनस्थिती जाणून घेतात. सर कधी वेळ मिळाला की प्रेरणादायी गोष्टी सांगून आमचा आत्मविश्वास वाढवतात. सर कधी कधी आम्हाला गोष्टीही सांगतात.

सर जसे प्रेमळ आहेत तसेच शिस्तप्रिय सुद्धा आहेत. सर वेळेला खूप महत्व देणारे असल्यामुळे आम्हाला सुद्धा वेळेचे महत्व समजले. घरचा अभ्यास नाही झाला तर सर छडी सुद्धा देतात. सरांचा छडी देण्यामागचा उद्देश एकच विद्यार्थ्यांचा विकास. सरांचा सर्व विद्यार्थ्यांसोबत एकसारखा व्यवहार असतो. सरांनी कधीही कोणा सोबत भेदभाव केला नाही त्यामुळे सरांबद्दल मला नेहमी आदर आहे. मला तर सरांचा तास कधी येतोय असे वाटते. सर शिकवताना आमच्या मनातील शंका सुद्धा दूर करत असतात. परीक्षेची तयारी करण्यासाठी सर सर्व सराव परीक्षा घेतात.शिक्षणासोबत सर आम्हाला आमच्या भवितव्यासाठी कोणत्या गोष्टी गरजेच्या आहेत हे सुद्धा सांगत असतात.वर्गामध्ये गणित विषय शिकवत असताना सर आम्हाला अनेक यशस्वी लोकांनी त्यांच्या आयुष्यात यश मिळवण्यासाठी घेतलेले श्रम सांगत असतात.

सरांमुळे आमचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. वर्गातील कोणत्या विद्यार्थ्यांकडे कधी परीक्षा फी भरण्यासाठी पैसे नसतील तर सर नेहमी मदत करतात. एखादी गोष्ट समजली नसेन तर ती गोष्ट वर्गामध्ये सरांना विचारायला भीती वाटत नाही.

गणित विषयासोबत सर क्रीडा शिक्षक सुद्धा आहेत. सर नेहमी खेळांचे महत्व आम्हाला सांगत असतात. खेळ आपल्या जीवनात का गरजेचे आहेत हे नेहमी पटवून देत असतात. सर मुलांना नेहमी खेळांसाठी प्रेरित करतात. शाळेतील सर्व कार्यक्रमात सरांचा खूप मोलाचा वाटा असतो. २६ जानेवारी, १५ ऑगेस्ट हे कार्यक्रम जवळ आले की सर ५ ते ६ दिवस आधीच आमची तयारी करून घेत असतात.

सर अतिशय प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष आहेत. शाळेतील सर्व कामे सर अतिशय जबाबदारीने करत असतात. कोणता विद्यार्थी आजारी असेन तर स्वतः सर घरच्यांशी विचारपूस करतात. शाळा सुरू झाल्यापासून ते संपेपर्यंत सर मुलांची काळजी घेतात.सरांचे शाळेतील स्वछतेकडे खूप लक्ष असते. सर स्वतः आमच्यासोबत शाळेची स्वछता करतात. स्वच्छतेसाठी सर छोटे छोटे उपक्रम घेत असतात. शाळेच्या आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सरांचे नेहमी प्रयत्न चालू असतात.मी जेव्हा शाळा संपल्यानंतर या स्पर्धात्मक जगात स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करेन तेव्हा सरांचे हे मार्गदर्शन माझा आत्मविश्वास वाढविण्यासाठी मला मदत करेन. माझे आईवडील मला नेहमी सांगत असतात आपण जीवनाच्या वाटेवर नेहमी काही न काही शिकत असतो.

स्पर्श न करता विद्यार्थ्याला शिक्षा करता येते तोच खरा शिक्षक.

आपल्या सर्वांच्या आयुष्यात शिक्षकाला खूप महत्व आहे. शिक्षक केवळ शिक्षकाच्या भूमिकेला चिकटून राहत नाही. गरज पडेल तेव्हा ते विविध भूमिकांमध्ये जुळवून घेतात. अशा प्रकारे, आपण पाहतो की शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनावर किती मोठा प्रभाव टाकतात आणि त्याला आकार देतात.

शिक्षक म्हटल्यावर डोळ्यासमोर एक आदर्श व्यक्तिमत्व उभारतं. या आणि अश्या प्रकारच्या व्यक्तिमत्वानीं माझ्या मनावर खोलकर परिणाम केला.



नाव : सायली दिपक म्हात्रे

बी. एड् प्रथम वर्ष

हजेरी क्रमांक :25

समाजाचा विकास केवळ सत्तेने होत नाही तो आदर्श शिक्षकांमुळे होतो.

# अब्राहम लिंकनचे हेडमास्तरांस पत्र

प्रिय गुरुजी,

सगळीच माणसे न्यायप्रिय नसतात
नसतात सगळीच सत्यनिष्ठ,
हे शिकेलच माझा मुलगा कधी - ना - कधी.
मात्र त्याला हे देखील शिकवा –
जगात प्रत्येक बदमाषागणिक
असतो एक साधुचरित पुरुषोत्तमही.
स्वार्थी राजकारणी असतात जगात
तसे असतात अवघं आयुष्य
समर्पित करणारे नेतेही.
असतात टपलेले वैरी
तसे जपणारे मित्रही.

मला माहीत आहे, सगळ्या गोष्टी
झटपट नाही शिकवता येत... तरीही
जमलं तर त्याच्या मनावर ठसवा,
घाम गाळून कमावलेला एकच छदाम
आयत्या मिळालेल्या घबाडापेक्षा
मौल्यवान आहे.


हार कशी स्वीकारावी ते त्याला शिकवा
आणि शिकवा
विजयाचा आनंद संयमानं घ्यायला.
तुमच्यात शक्ती असली तर त्याला
द्वेषमत्सरापासून दूर रहायला शिकवा.
शिकवा त्याला
आपला हर्ष संयमानं व्यक्त करायला.

गुंडांना भीत जाऊ नको म्हणावं,
त्यांना नमवणं सर्वांत सोपं असतं!

जमेल तेवढं दाखवीत चला त्याला
ग्रंथभांडाराचं अद्भुत वैभव,
मात्र त्याबरोबरच,
मिळू दे त्याच्या मनाला निवांतपणा
सृष्टीचं शाश्वत सौंदर्य अनुभवायला.
पाहू दे त्याला
पक्ष्यांची अस्मानभरारी...
सोनेरी उन्हात भिरभिरणारे भ्रमर...
आणि हिरव्यागार डोंगरउतारावर
डुलणारी चिमुकली फुलं.

शाळेत त्याला हा धडा मिळू दे –
फसवून मिळविलेल्या यशापेक्षा
सरळ आलेलं अपयश श्रेयस्कर आहे.

आपल्या कल्पना आपले विचार यांच्यावर
दृढ विश्वास ठेवायला हवा त्यानं,
बेहेत्तर आहे सर्वांनी त्याला
चूक ठरवलं तरी.
त्याला सांगा
त्यानं भल्यांशी भलाईनं वागावं
आणि टग्यांना अद्दल घडवावी.



माझ्या मुलाला
हे पटवता आलं तर पहा –
जिकडे सरशी तिकडे धावत सुटणाऱ्या
भाऊगर्दीत सामील न होण्याची ताकद
त्यानं कमवायला हवी.
पुढे हेही सांगा त्याला
ऐकावं जनांचं, अगदी सर्वांचं... पण
गाळून घ्यावं ते सत्याच्या चाळणीतून,
आणि फोलपट टाकून
निकं सत्त्व तेवढं स्वीकारावं.
जमलं तर त्याच्या मनावर बिंबवा –
हसत रहावं उरातलं दुःख दाबून.
आणि म्हणावं त्याला,
आसू ढाळायची लाज बाळू देऊ नको.
त्याला शिकवा
तुच्छतावाद्यांना तुच्छ मानायला
अन् चाटुगिरीपासून सावध रहायला.

त्याला हे पुरेपूर समजावा की
करावी कमाल कमाई त्याने
ताकद आणि अक्कल विकून...
पण कधीही विक्रय करू नये
हृदयाचा आणि आत्म्याचा!
धिक्कार करणाऱ्यांच्या झुंडी आल्या तर
कानाडोळा करायला शिकवा त्याला,
आणि ठसवा त्याच्या मनावर –
जे सत्य आणि न्याय्य वाटते
त्याच्यासाठी पाय रोवून लढत रहा.

त्याला ममतेनं वागवा पण
लाडावून ठेवू नका.
आगीत तावूनसुलाखून निघाल्याशिवाय
लोखंडाचं कणखर पोलाद होत नसतं.
त्याच्या अंगी बाणवा
अधीर व्हायचं धैर्य,
अन् धरला पाहिजे धीर त्यानं
जर गाजवायचं असेल शौर्य.
आणखीही एक सांगत रहा त्याला –
आपला दृढ विश्वास पाहिजे आपल्यावर
तरच जडेल उदात्त श्रद्धा मानवजातीवर.

माफ करा गुरुजी!
मी फार बोलतो आहे,
खूप काही मागतो आहे...
पण पहा, जमेल तेवढं अवश्य कराच.
माझा मुलगा –
भलताच गोड छोकरा आहे हो तो.

... अब्राहम लिंकन

रूपांतर : वसंत बापट
साधना प्रकाशन, पुणे ४११ ०३०.